

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते।

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine March 2025 - Pages - 72**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे | कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक ५ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




विद्याभवन हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवीमुंबई येथे
दि. २१ जानेवारी २०२५ रोजी माध्यमिक विभाग व कनिष्ठ महाविद्यालय वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी
प्रमुख अतिथी सन्माननीय श्री. किसनराव पलांडे, (उपआयुक्त समाज विकास विभाग, नवी मुंबई महानगरपालिका)
यांचे स्वागत व सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
समवेत डावीकडून अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे आणि कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

## * विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई *



पूर्व प्राथमिक इंग्रजी विभाग पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या श्रीमती सरला नरेंद्रन यांचे स्वागत करताना अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे व कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



पूर्व प्राथमिक इंग्रजी विभाग पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी विशेष अतिथी श्रीमती लक्ष्मी गोपाळकृष्णन यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



माध्यमिक मराठी विभाग पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या श्रीमती रजनी तायवाडे यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व श्री. के. एन. शिरकांडे



इ. १०वी निरोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. डी. व्ही. बोऱ्हाडे यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे




प्राथमिक मराठी विभाग वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या श्रीमती रुक्मिणी श्रीकृष्ण दीक्षित (माजी मुख्याध्यापिका), विशेष अतिथी श्रीमती वंदना अरुण गोखले (माजी मुख्याध्यापिका) व इतर मान्यवर

संपादकीय

# श्रीरामकृष्ण परमहंसांचे विचारधन

ज्याप्रमाणे आपल्याकडे महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाने आध्यात्मिक लोकशाहीची स्थापना केली. त्याचप्रमाणे बंगालमध्ये श्रीरामकृष्ण परमहंसांनी आध्यात्मिक लोकशाही स्थापनेचे कार्य केले. सर्वसामान्य प्रापंचिकांना 'मुखी नाम, हाती मोक्ष' ही शिकवण दिली.

कालीमातेचे निःसीम उपासक श्रीरामकृष्ण वस्तुतः परमज्ञानी होते. कर्म, ज्ञान, भक्ती आणि योग हे जे आत्मज्ञानाचे चार मार्ग त्या चारही मार्गांमध्ये ते परिपूर्ण होते. त्याचबरोबर त्यांनी ख्रिश्चन आणि मुसलमान धर्म तत्त्वांचाही सखोल अभ्यास केला होता.

अध्यात्मज्ञानाची पखरण करून समाजाचे उन्नयन करणे हे श्रीरामकृष्णांचे जीवितकार्य होते. इहलोकात प्रापंचिक जनांची संख्या जास्त असल्याने वारकरी संप्रदायाप्रणेच बहुजनांना झेपेल, पचेल आणि पटेल अशा भक्तिमार्गाचेच विवरण श्रीरामकृष्णांनी प्रामुख्याने केले.

**'भरणी आली मुक्त पेठा, करा लाटा व्यापार,**
**उधार घ्या रे उधार घ्या रे, अवघे या रे जातीचे,'**

या आपल्याकडील संत तुकारामांप्रमाणेच श्रीरामकृष्णांचा आग्रह होता.

'बुडते हे जन न देखवे डोळा', या समस्त मानवजातीबद्दलच्या अफाट कळवळ्याने अहेतुक कृपासिंधू श्रीरामकृष्ण आपले तत्त्वज्ञान मांडत होते.

राणी रासमणीच्या कालीमंदिरात पुजारी असलेल्या श्रीरामकृष्णांच्या रूपाने कालीमातेने गंगेकाठी 'खेळ मांडियेला' आणि मानवी जीवनाला दिशा देण्याचे कार्य केले.

श्रीरामकृष्ण हे जरी स्वतः परिपूर्ण ज्ञानी असले तरी, आपण जगन्मातेचे अपत्य आहोत या त्यांच्या भूमिकेमुळे मूल ज्या सहजतेने आपल्या मागण्या, आपले हट्ट आईपुढे मोठ्या सहजतेने व मोकळेपणाने मांडते त्याचप्रमाणे, फक्त आणि फक्त देवीच्या दर्शनाचाच हट्ट आणि आग्रह असलेल्या श्रीरामकृष्णांनी देवीमातेकडे तिच्याच उपासनेचे बळ मागितले. पंढरीच्या लेकुरवाळ्या विठ्ठलाशी ज्याप्रमाणे वारकरी संप्रदायाने 'माऊलीचे' नाते जोडले तोच भाव श्रीरामकृष्णांचा होता.

श्रीरामकृष्णांनी देवीमातेच्या आराधनेत कधी कर्मकांडाचा बाऊ वा आग्रह धरला नाही. 'योगक्षेमं वहामि अहम्' हेच तिचेही ब्रीद असल्याने ती जगज्जननी निश्चितपणे आपल्या भक्ताला सांभाळेल हा त्यांचा विश्वास होता. अनुभव होता. त्यासाठी फक्त निर्मळ मनाने तिची सदैव उपासना करा असे ते सांगत.

**'माय बाप बंधु बहिणी । तू बा सखा चक्रपाणि ।'**

असे अनन्यत्वाचे नाते तिच्याशी जोडले की, ती कनवाळू जगन्माता आपला अव्हेर कधीच करणार नाही असे ते म्हणत.

प्रापंचिकाला प्रपंच टाळणे शक्य नसल्याने प्रपंचात राहून मुक्ती कशी मिळवावी याचे मार्गदर्शन करताना श्रीरामकृष्ण प्रपंचातलेच दाखले देतात.

श्रीरामकृष्ण सांगतात की, संसारात वावरताना आपली वृत्ती जमीनदाराकडल्या नोकराप्रमाणे ठेवावी. नोकर घरातील सर्व कामे प्रामाणिकपणे व आपलेपणाने करतो पण, हे आपले नाही याची जाणीव त्याला अंतर्यामी असतेच. त्याप्रमाणे प्रत्येकाने 'खरे घर ते' ही जाणीव ठेवून प्रपंचात वागावे.

श्रीमंताघरचा माळी आल्यागेल्याला मोठ्या अभिमानाने व कौतुकाने त्याने उमलवलेली बाग दाखवत असला तरी, त्या बागेतल्या वाळक्या पानावरही आपली सत्ता नाही हे तो जाणत असतो त्याप्रमाणे, प्रत्येकाने प्रपंचात अलिप्त राहून कार्य करावे, आपले विहित कर्तव्य करावे.

फणस कापताना हात बरबटतात पण, हाताला तेल लावले तर, हात स्वच्छ राहतात त्याप्रमाणे जगन्मातेच्या नामजपाने प्रपंच तरणे सहजशक्य आहे.

ज्याप्रमाणे पितळेचा किंवा तांब्याचा लोटा रोजच्या रोज स्वच्छ केला नाही तर, डागाळतो त्याप्रमाणे, श्रध्देने आणि निष्ठेने उपासनेला चालवले तर, मन लखलखीत होत जाते.

शुध्द मनोभाव हा परमेश्वरप्राप्तीचा सहजमार्ग आहे. त्यामुळेच कालीमंदिरात पूजन करताना राणी रासमणीच्या मनात आलेले प्रांपचिक विचार जाणून श्रीरामकृष्णांनी राणीच्या गालवर चापट मारीत, 'काय? येथेही तेच विचार?' म्हणून खडसावले होते.

पुजाऱ्याच्या हातून देवळातील कृष्णमूर्ती पडल्याने मूर्तीचा हात भंगला तेव्हा, अशी मूर्ती विसर्जित करावी का काय करावे यासाठी विद्वत्जन खल करीत होते पण, ठोस निर्णय होत नव्हता. या संदर्भात राणीने जेव्हा श्रीरामकृष्णांना विचारले तेव्हा, श्रीरामकृष्ण म्हणाले होते, 'समजा राणीच्या जावयाचा हात तुटला असता तर?' या प्रश्नातच राणीला तिच्या समस्येचे उत्तर मिळाले. नंतर त्या मूर्तीचा हात सांधून देवळात तिची पूजाअर्चा पूर्ववत सुरू राहिली.

आपल्या परीने दुसऱ्याचे दुःख दूर करण्याचा सदैव प्रयत्न करावा, या श्रीरामकृष्णांच्या शिकवणुकीनुसार श्रीरामकृष्णांच्या समाधीनंतर स्वामी विवेकानंद, मास्टर महाशय, वंगरंगभूनीचे जनक 'गिरीश', गोलाप माँ, गौरी माँ, स्वामी शिवानंद, नागमहाशय, स्वामी विरजानंद, स्वामी शारदानंद आदी श्रीरामकृष्ण चरणाश्रितांनी स्वामी विवेकानंदांच्या पुढाकाराने श्रीरामकृष्ण मिनशद्वारे 'शिवभावे जीवसेवा' या मार्गाची निवड केली. रूग्णाईतांची सेवा, आधुनिक शिक्षणाची सोय, वृध्दांची काळजी, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांची सेवा आदी कार्याद्वारे मानवतेची उपासना करण्यास प्रारंभ केला.

दीनदुबळ्यांना आत्मभान देण्याचे कार्य श्रीरामकृष्ण आश्रमाद्वारे करत आपले गुरू श्रीराकृष्ण परमहंस यांचा सेवा आणि भक्तीचा वारसा आजही श्रीरामकृष्ण शिष्य परिवार मोठ्या अभिमानाने जोपासत आणि समृध्द करीत आहेत.

दि. २६ फेब्रुवारी २०२५
महाशिवरात्री

# आदरांजली



नाशिक शहरातल्या आदर्श ब्रेडचे आदर्श उत्पादक असलेल्या धामणकर परिवारतल्या ती. स्व. गंगुताई धामणकर मोठ्या कर्तृत्ववान होत्या.

धामणकर परिवाराला सातत्याने आदर्शतेचा ध्यास होता. गंगुताई ही आपल्या या पारिवारिक मनोवृत्तीला अपवाद नव्हत्या.

गंगुताईंचे बंधू श्रीकृष्ण धामणकर यांनी बेकरी व्यवसायाची आवड असल्याने या व्यवसायात पाऊल टाकले. ही प्रारंभीची वाटचाल अतिशय अवघड होती. परंतु, संपूर्ण धामणकर परिवाराने एकदिलाने या व्यवसायात स्वतःला झोकून दिले आणि पाहता पाहता या बेकरी व्यवसायात हा परिवार अव्वल ठरला. परिवारातल्या प्रत्येकाने स्वतःला या व्यवसायाला वाहून घेतल्याने अल्पावधितच या व्यवसाय क्षेत्रात धामणकर परिवार म्हणजे एक मानाचे पान ठरला.

बेकरी उद्योगाकडे गंगुताईंनी अथवा धामणकर परिवाराने फक्त एक नफ्याचा व्यवसाय म्हणून पाहिले नाही तर त्या व्यवसायाचे पावित्र्यही त्यांनी जपले.

आपण जो व्यवसाय करणार आहोत त्याची सांगोपांग माहिती आपल्याकडे असायलाच हवी हा गंगुताईंचा आग्रह असल्याने गंगुताईंनी बेकरी व्यवसायाचा शास्त्रशुध्द अभ्यास सुरू केला. ताईंनी प्रथमतः घरातले स्वयंपाकघर हीच आपली प्रयोगशाळा बनवली. बेकरी उत्पादनाच्या खाचाखोचा समजून घेण्यासाठी एकलव्याप्रमाणे साधना केली. त्यानंतर पुण्याच्या फूड क्राफ्ट इन्स्टिट्यूटमध्ये बेकरीचा कोर्स पूर्ण केला. हा कोर्स केल्याने ताईंचा आत्मविश्वास अधिकच वाढला.

त्या काळात आजच्या एवढी यंत्रसामुग्री अद्ययावत नव्हती आणि प्रारंभीच्या काळात ती खरेदी करण्याइतके आर्थिक पाठबळही नव्हते. त्यामुळे कोपरापर्यंत येतील असे ग्लोव्हज् घालून पीठ मळण्यापासून बेकरीतील सर्व कामे ताई स्वतः करत.

बेकरीतील भट्टी पहाटे पाच वाजता ब्रेड भाजण्यास तयार ठेवणे, खारी लाटणे, त्यावर पाणी मारणे ही कामे ताई हिरहिरीने करीत. नाशिकच्या कडाक्याच्या थंडीत कामगार मिळणे अवघड व्हायचे. त्या काळात आपल्या भावंडांच्या मदतीने ताई ही सारी कामे करीत. पाच ते सहा किलो वजनाच्या लाटण्याने तासनतास लाटताना किती कष्ट होत असतील हे आपण कल्पनेनेच जाणू शकतो. पण आपला व्यवसाय नावारूपाला आला पाहिजे, त्याचा दर्जा टिकला पाहिजे म्हणून ताईंनी पडणाऱ्या कामाबद्दल कधीही कुरकुर वा तक्रार केली नाही.

ब्रेड तयार झाल्यावर त्याचे कटिंग व पॅकिंगचेही काम ताई करीत.

बेकरी व्यवसायाबरोबरच धामणकर भगिनींनी 'सर्वोत्तम मसाला सुपारी'चेही उत्पादन सुरू केले.

उद्योगप्रांतात यशस्वी व्हायचे असेल तर, उद्योजकाने नेहमी सतर्क राहिले पाहिजे हे ताईंचे ब्रीदवाक्य होते. एकदा नाशिक बाजारात त्या गेल्या असता खरेदीला आलेल्या दोन व्यक्तींचे संभाषण त्यांच्या कानी आले. त्यात उद्या आदर्श ब्रेड मिळणार नाही हे सूत्र होते. घरातून निघतानाही या संबंधात ताईंना काहीच कल्पना नव्हती तर, उलट सारा व्यावसायिक दिनक्रम व्यवस्थितपणे सुरू असल्याचे पाहूनच त्या घराबाहेर पडल्या होत्या. खरेदी सोडून ताई तडक घरी परतल्या. सगळ्या भावंडांना ही बातमी सांगून नंतर त्यांनी त्या बातमीची खातरजमा सुरू केली. तेव्हा धामणकर उद्योग समूहाचे यश सहन न होऊन काही हितशत्रूंनी कामगारांना फितवून उत्पादनात अडथळा आणण्याचे कारस्थान केल्याचे समजले. फितूर कामगारांना त्या दिवसार्पंतची मजुरी देऊन बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. म्हणूनच ताई सदैव म्हणत की, माणसाने सदैव आपले कान आणि डोळे उघडे ठेवावेत आणि शक्य तो मिटल्या ओठी रहावे.

आपल्या व्यवसायात ताई जशा दक्ष असायच्या त्याचप्रमाणे आपले हक्क आणि कर्तव्यांबाबतही त्या अतिशय जागृत असायच्या. एकदा रेल्वेने प्रवास करताना रिझर्व्हेशन डब्यातील अनागोंदी पाहून ताईंनी गार्डला ती दूर करण्याबाबत विनंती केली. तेव्हा त्या गार्डने पुढल्या स्टेशनवर ताईंनाच उतरवून टाकले. आपल्यावरच्या या अन्याय निवारणार्थ थेट रेल्वे मंत्र्यापर्यंत ताईंनी ते प्रकरण लावून धरले.

सरकारी कर्मचाऱ्याने नागरिकांशी कधीही अरेरावीने वागू नये कारण, सरकारी नोकर हा सरकारचे प्रतिनिधीत्व करीत असतो आणि लोकशाहीमध्ये सरकार हे लोकांचे असते. म्हणूनच सरकारी नोकराचे सार्वजनिक आचरण हे धुतल्या तांदळाप्रमाणे असावे असे त्या म्हणत. त्यामुळे एखादा कर्मचारी जर गैर वागत असेल तर, त्याची कान उघाडणी करायलाही ताई मागेपुढे पहात नसत. पोस्टमन, महानगरपालिकेचे कर्मचारी आदी सरकारी नोकरांना ताई आपल्या कर्तव्याची आणि नागरिकांप्रती असलेल्या आपल्या बांधिलकीची जाणीव करून देत.

प्रत्येक व्यक्तीने जीवनात सामाजिक ऋण फेडले पाहिजे या जाणीवेने ताई व धामणकर परिवार डोळसपणे सामाजिक कार्यात सदैव आघाडीवर असे. प्रामुख्याने नाशिक मधील अनेक संस्थांना त्यांनी सढळ हाताने नेहमीच मदत केली. पुणे विद्यार्थी गृहाचे कार्य आणि या संस्था चालकांचा पारदर्शी व्यवहार लक्षात आल्याने धामणकर परिवाराने संस्थेला अगदी एक रकमी एक कोटी रुपयांपर्यंत मदत केली होतीच, पण आपल्या व आपल्या बहिणीच्या पश्चात् आपले राहते घरही ताईंनी पुढाकार घेऊन पुणे विद्यार्थी गृह संस्थेला दिले. ताईंचे कर्तृत्व पाहता म्हणावेसे वाटते,

'हिम उडे जरेचे शिरी, स्मित मुखी तरुण
तव मूर्ती पुढे ती दिसतसे अजून
तोलिलास वीरा ध्वज रुधीरही ओकून
तव रक्त पसरले अरुणोदय होऊन'

ईश्वर ताईंना सद्‌गती देवो ही प्रार्थना. ओम शांतिः शांतिः शांतिः। ***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**

**मुख्याध्यापिका : सौ. मधुमती कदम (माध्यमिक)**

### इ. १० वी निरोप समारंभ

दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी इयत्ता दहावीच्या मुलांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी या विद्यार्थ्यांची कल चाचणी घेऊन त्यांना भविष्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या संस्थेचे प्रमुख श्री. पियूष यादव हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे व सौ. मधुमती कदम, दोन्ही विभागाच्या पर्यवेक्षिका अनुक्रमे निता गर्ग आणि स्वरुपा मोरे व माजी शिक्षिका सौ. बापट याही उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. भारती पराड यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मोशन तर्फे आयोजित परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. दहावीच्या विद्यार्थ्यांनी मनोगतातून शाळेविषयीच्या भावना व्यक्त केल्या. मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पेपर लिहिण्याविषयी मार्गदर्शन केले. सोनाली शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

### मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन

दि. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ९वीच्या मुलांसाठी मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले होते. डॉ. चेतन उमप हे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. निर्धार या विद्यार्थ्यांच्या अडचणींवर त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या संस्थेच्या सौ. अश्विनी जोशी यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. चेतन उमप यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या यशस्वी प्रवासात त्यांना आलेल्या अडचणींवर त्यांनी कशी मात केली, अभ्यास करताना नियोजन कसे असावे, वेळेचा वापर कसा करावा, तणावाचे नियंत्रण कसे करावे, वाचनाचे महत्त्व काय आहे अशा बऱ्याच गोष्टींवर चर्चा केली. मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम, पर्यवेक्षिका स्वरुपा मोरे यांनी डॉ. चेतन उमप यांचे आभार मानले. निर्धारच्या सर्व ताई, शिक्षक, विद्यार्थी यांच्या सहकार्याने सत्र यशस्वीरीत्या पार पडले.

### शिवजयंती उत्साहात साजरी

दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. 'जय शिवाजी, जय भारत' अंतर्गत माय भारत संस्थेने पुण्यातील सर्व शाळांसाठी पदयात्रेचे आयोजन केले होते. यामध्ये आपली शाळा सहभागी झाली होती. इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी लेझिम पथक, ढोल पथक यांसह पदयात्रेत सहभाग नोंदवला. सी. ओ. ई. पी. महाविद्यालय ते फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. पुणे जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी सौ. प्रणिती कुमावत यांनी विद्यार्थी शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी सी. ओ. ई. पी. महाविद्यालयाच्या ग्राऊंडवर महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित युवा पिढीला मौल्यवान मार्गदर्शन केले. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे विचार अंगीकरण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले. 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत त्यांनी वृक्षारोपण केले. मा. चंद्रकांत पाटील, मा. रक्षा खडसे, मा. मेधा कुलकर्णी इ. मंत्री महोदय उपस्थित होते. फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये सादर कार्यक्रमाची सांगता झाली. मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम यांनी विद्यार्थी शिक्षकांना मार्गदर्शन केले. शाळेच्या खेळ शिक्षिका कु. चंदा, सहाय्यक शिक्षिका सौ. प्राजक्ता मुरमट्टी या कार्यक्रमासाठी शिक्षक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होत्या.

***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्साहात साजरी

गुरूवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य व्ही. पी. गावडे आणि बी. एड. छात्र अध्यापक यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुख अध्यापिका सौ. सविता जगताप यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पुष्प वाहून पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत बी. एड. छात्र अध्यापक श्री. गोकुळ भगरे यांनी केले. अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते आणि अध्यापिका सौ. सविता जगताप यांचे बी. एड. छात्र अध्यापिका सौ. माधवी पाडवी यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. विद्यार्थी कु. संकेत विष्णू नाईक व कु. वैभवी कदम इ. ९वी अ यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विषयी माहिती सांगितली. अध्यापिका सौ. सविता जगताप आणि बी. एड. छात्र अध्यापिका सौ. राजश्री पाटील यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमास प्रशालेतील इ. ५ वी ते १० वी चे विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, बी. एड. छात्र अध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एड. छात्र अध्यापिका सौ. राजेश्वरी सुनील केंदळे यांनी केले. फलक लेखन बी. एड. छात्र अध्यापक श्री. अक्षय मसरकोल्हे यांनी केले. सौ. अंजली कोल्हे यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

### अभिनंदनीय

पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग यांचे संयुक्त विद्यमाने सन २०२४ - २०२५ मध्ये राबवण्यात आलेल्या गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत शाळांचे विविध ३ गट करून शाळांची तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार विद्यार्थी संख्या ५०१ ते १००० या गटातून विद्यालयाची सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी शिक्षण विभागातील अधिकारी व मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी यांच्या पथकाकडून तपासणी करण्यात आली व त्यामध्ये वर उल्लेख केलेल्या गटातून क्लस्टर, पुणे शहर (तालुका) मध्ये विद्यालयाचा द्वितीय क्रमांक आला. **महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, पुणे व मुंबई विभागाचे ॲक्सिस बँकेचे अध्यक्ष श्री. संजीव मोघे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत गायन झाले. विद्यालयाच्या एन. सी. सी. छात्रांनी आणि मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा, पुणेच्या स्काऊट व गाईडच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. महाराष्ट्र विद्यालयाचे अध्यापक श्री. प्रशांत बोंबलट यांनी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून ध्वजप्रतिज्ञा म्हणवून घेतली. अध्यापिका सौ. भारती पऱ्हाड यांनी प्रशालेतील विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून संविधान प्रास्ताविकेचे वाचन करवून घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा, पुणेच्या मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम यांनी केले. सौ. गीता दुसारिया यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुणे श्री. संजीव मोघे यांचा कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते

पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सौ. शिल्पा मोघे यांचा सत्कार मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा पुणे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन केला. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक श्री. रमेश कुलकर्णी यांचा सत्कार मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे, महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेचे प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे, शिशुनिकेतन मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे, मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांचा सत्कार मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे यांनी गुलाबपुष्प देऊन केला.

माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई यांच्यातर्फे प्रशालेतील कु. सार्थक रविंद्र घुले, कु. प्रशांत प्रवीण नागदे, कु. चैतन्य संभाजी गरूड इ. ६ वी आणि कु. सार्थक लक्ष्मण कर्डिले, कु. आर्यन रविंद्र फरगडे, कु. युवराज संजय ढाकणे इ. ७ वी, कु. मंदार राजप्पा तेलंग, कु. अथर्व नाना पवार, कु. हर्षराज अजित पऱ्हाड इ. ८ वी, कु. वेदांत नामदेव कोकितकर, कु. जयेश जालिंदर दौंडकर इ. ९ वी आणि कु. युवराज संजय पवार इ. १० वी या गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १,०००/- चे पारितोषिक प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई पारितोषिक यादीवाचन अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. विद्यालयातील इ. ५ वी ते इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी लेझीमचे प्रात्यक्षिक आणि लाठी - काठी वरील नृत्य सादर केले. याप्रसंगी मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखेच्या विद्यार्थ्यांनी विविध कला सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखेच्या अध्यापिका सौ. नीता गर्ग यांनी केले. यानंतर प्रमुख पाहुणे श्री. संजीव मोघे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखेच्या अध्यापिका सौ. स्वरूपा मोरे यांनी केले. फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. आभार प्रदर्शन मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखेच्या अध्यापिका सौ. शारदा थोरवे यांनी केले. या प्रसंगी संस्थेच्या विविध विभागातील प्राध्यापक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी, पालक, देणगीदार उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम या राष्ट्रगीताने करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

### शुभेच्छा समारंभ

शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. पी. गावडे हे होते. प्रमुख अतिथी प्रशालेच्या माजी विद्यार्थी संघाचे सदस्य इ. १० वी (१९९६-९७ बॅच) व सध्या टी. सी. एस. कंपनीमध्ये असोसिएट कन्सलटंट पदावर कार्यरत असलेले श्री. गणेश मेघना श्रीधर जोशी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचा आरंभ ईशस्तवनाने करण्यात आला. याप्रसंगी बी. एड. छात्र अध्यापक, अध्यापिका सौ. राजेश्वरी केंदळे, सौ. माधुरी पाडवी, सौ. दुर्वा कळंबबाटे, श्री. गोकुळ भगरे, श्री. अक्षय मसरकोल्हे यांनी स्वागतगीत गायले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. विद्यार्थी कु. युवराज पवार, कु. ओम गावडे, कु. स्वप्निल हावळे, कु. आर्यन कांबळे, कु. साई ढवळे, कु. सार्थक शिंदे, कु. विनायक आहेर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे श्री. गणेश मेघना श्रीधर जोशी, अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने आणि श्रीमती वैशाली मोघे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी कु. युवराज पवार याने काव्यही सादर केले. यानंतर प्रमुख पाहुणे श्री. गणेश मेघना श्रीधर जोशी, इतर सर्व

उपस्थित असलेले माजी विद्यार्थी, प्राचार्य व्ही. पी. गावडे या सर्वांच्या हस्ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना लेखन पॅड, पेन, पट्टी असे साहित्य भेट देण्यात आले. आभार प्रदर्शन अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. कार्यक्रमासाठी फलक लेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. बी. एड. छात्र अध्यापक आणि अध्यापिका यांनी रांगोळी काढली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी केले. कार्यक्रम पत्रिका अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांनी तयार केली. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांना अल्पोपहार देण्यात आला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**शिवजयंती उत्साहात संपन्न**

दि. २० फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी ढोल ताशांच्या गजरात आणि लेझीमवर नृत्य करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पालखीतून वाजत गाजत मिरवणूक काढली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था कर्वेनगर, पुणे येथील स्कूल ऑफ मीडिया एक्टिव्हिटी रिसर्च अँड टेक्नॉलॉजीचे सहाय्यक प्राध्यापक अहमद मोहम्मद शेख आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष अध्यापक डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. प्राध्यापक अहमद मोहम्मद शेख यांचा सत्कार अध्यापक डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी करून दिला. इ. ५ वी ते इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी पोवाडा, शिवगर्जना, शिवाजी महारांजांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. प्राध्यापक अहमद मोहम्मद आणि अध्यापक डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनीही शिवाजी महाराजांविषयी माहिती सांगितली. आभार प्रदर्शन अध्यापिका सौ. रोशनी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी केले. कार्यक्रमासाठी फलक लेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. या प्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. ***

**❊ महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ❊**



**प्रजासत्ताक दिन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे पुणे व मुंबई विभागाचे ॲक्सिस बँकेचे अध्यक्ष श्री. संजीव मोघे यांचा सत्कार करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत डावीकडून मुख्याध्यापिका सौ. अरूणा कांबळे, प्र. प्राचार्य पी. व्ही. शिंदे, संचालक श्री. रमेश कुलकर्णी आणि डॉ. राजेंद्र कांबळे, सौ. शिल्पा मोघे, मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम, प्राचार्य व्ही. पी. गावडे**

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

## हिवाळी परीक्षा २०२४ निकाल

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेमार्फत डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांचा निकाल दि. २७ जानेवारी २०२५ रोजी जाहीर करण्यात आला. प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे

| वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| प्रथम | कु. अनिरुद्ध गुळूमकर | ७५.४१ | प्रथम |
| | कु. ओंकार नरवडे | ७१.४१ | द्वितीय |
| | कु. शिवम मराठे | ७०.८२ | तृतीय |
| द्वितीय | कु. आर्यन अकोले | ८७.१८ | प्रथम |
| | कु. विक्रांत माने | ८६.७१ | द्वितीय |
| | कु. संकेत इंगोले | ८४.१२ | तृतीय |
| तृतीय | कु. रितू बोराटे | ८४.७१ | प्रथम |
| | कु. उज्वल शर्मा | ८१.०० | द्वितीय |
| | कु. मोनाली काळे | ८०.४३ | तृतीय |

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा

महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत दि. ३१ डिसेंबर २०२४ ते दि. १५ जानेवारी २०२५ या दरम्यान वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संस्थेच्या ग्रंथालय विभागामध्ये पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी सामूहिक वाचन सत्राचे आयोजन करण्यात आले होते विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण निबंध स्पर्धा व कथा कथन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धांमधे पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

**पुस्तक परीक्षण निबंध स्पर्धा**

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. विक्रांत माने | प्रथम |
| कु. नेहा पटनुरे | द्वितीय |

**पुस्तक परीक्षण कथा कथन स्पर्धा**

| | |
|---|---|
| कु. रामेश्वर कुरंगळ | प्रथम |
| कु. अथर्व घावट | द्वितीय |

या विद्यार्थ्यांना २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरीत करण्यात आले.

## स्थानिक लेखकांचा परिसंवाद

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत लेखक श्री. सुप्रसाद पुराणिक यांचे 'वाचनाचे महत्त्व' या संदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. सुप्रसाद पुराणिक यांची तीन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अनेक वृत्तपत्रांमध्ये त्यांचे लेख प्रसिध्द झाले आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच त्यांच्या पुस्तकांचा थोडक्यात परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. सदरील परिसंवादाचे आयोजन दि. ६ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले होते. या परिसंवादामध्ये एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राध्यापक श्री. रोशन चौधरी यांनी श्री. सुप्रसाद पुराणिक यांचा परिचय करून दिला. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांचे नियोजन श्री. रोशन चौधरी व श्री. श्रीकांत वासकर यांनी केले.

## प्रिंट समिट

टाटा थिएटर, एनसीपीए, मुंबई येथे प्रिंट समिटचे आयोजन करण्यात आले होते. प्रिंट समिट २०२५ चे मुख्य उद्दिष्ट प्रिंटिंग व पॅकेजिंग उद्योगातील नवीन तंत्रज्ञान, आधुनिक प्रक्रिया उद्योगातील अद्ययावत ट्रेंड्स तसेच पर्यावरण पूरक तंत्रज्ञान याविषयी माहिती देणे होते. विद्यार्थ्यांना उद्योगातील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळावी, विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन विकसित व्हावा आणि भविष्यातील करिअरच्या संधी बाबत जागरूकता निर्माण करावी हे देखील या समितीचे

प्रमुख उद्दिष्ट होते. विद्यार्थ्यांना प्रिंटिंग व पॅकेजिंग क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञानाबाबत सखोल माहिती मिळाली. विद्यार्थ्यांना विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचा उद्योग क्षेत्राबद्दल आत्मविश्वास वाढला. नेटवर्किंगची संधी मिळाल्यामुळे भविष्यातील करिअरच्या संधी बाबत नवीन दृष्टिकोन निर्माण झाला. प्रिंट समिट प्रिंटिंग व पॅकेजिंग तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच या क्षेत्रातील व्यावसायिक संशोधक आणि उद्योजक यांच्यासाठी आयोजित करण्यात आली होती. प्रिंट समिट २०२५ चे आयोजन बॉम्बे मास्टर प्रिंटर्स असोसिएशन (बी. एम. पी. ए.) यांनी केले होते. या प्रिंट समिटसाठी संस्थेतील वेगवेगळ्या वर्गातील ९ विद्यार्थी आणि दोन शिक्षक सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांसाठी हा अनुभव शैक्षणिक दृष्ट्या उपयुक्त ठरला.

### अतिथी व्याख्यान

दि. १३ जानेवारी २०२५ रोजी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासासाठी एकाग्रता तसेच त्यांना मोबाईल फोनच्या अतिरिक्त वापरापासून परावृत्त करण्यासाठी 'मेडिटेशन इन्स्टंट लाईफ' या विषयावर श्री. विजयकुमार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रथम द्वितीय वर्षातील ८० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते या व्याख्यानाचे आयोजन प्राध्यापक श्री. राजेश जाधव यांनी केले.

### क्रीडा स्पर्धा- २०२४ - २५

विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुणांना वाव मिळावा तसेच विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना निर्माण व्हावी यासाठी संस्थेमध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम व द्वितीय वर्षातील मुद्रण पदविकेच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. दि. १७ व १८ जानेवारी २०२५ रोजी सदर क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. बुद्धिबळ, कॅरम, बॉक्स क्रिकेट व व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला. या क्रीडा स्पर्धांचे आयोजन प्राध्यापक श्री. शंकर शेळकंदे यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मदतीने केले.

### इंटर झोनल क्रीडा स्पर्धा २०२४ - २५

पदविका विद्यार्थ्यांसाठी इंटर इंजिनियरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स अंतर्गत इंटर डिप्लोमा झोनल क्रीडा स्पर्धा २०२४ - २५, विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा तसेच संघ भावना निर्माण व्हावी यासाठी दि. २२ जानेवारी २०२५ रोजी बुद्धिबळ व कॅरम, दि. २८ जानेवारी २०२५ रोजी कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेतील प्रथम व द्वितीय वर्षातील २० विद्यार्थ्यांनी या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. या स्पर्धांसाठी प्राध्यापक श्री. शंकर शेळकंदे, श्री. विष्णू बोत्रे व श्री. एस. के. बंडगर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### औद्योगिक कार्यशाळा व भेट

✻ श्री. प्रशांत देशमुख, संचालक स्क्रीनसेट पुणे यांचे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. प्रशांत देशमुख यांनी स्क्रीन प्रिंटिंग विषयांमधील संधींबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. भविष्यात स्क्रीन प्रिंटिंगचा वापर प्रिंटेड इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रियल प्रिंटिंग करता वाढणार असून विद्यार्थ्यांना भविष्यात याचा फायदा होणार आहे. तसेच स्क्रीन प्रिंटिंगचे अद्ययावत तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना हाताळता यावे याकरता दि. २८ व २९ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन स्क्रीन सेट, पुणे येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेला ४० विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेचे नियोजन प्र. प्राचार्य पी. व्ही. शिंदे व श्री. आर. एल. गबाले यांनी केले

✻ द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी कदम डिजिटल पुणे येथे दि. २९ व ३१ जानेवारी २०२५ रोजी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. डिजिटल प्रिंटिंग विषयाचे अद्ययावत तंत्रज्ञान आणि डिजिटल प्रिंटिंगसाठी वापरण्यात येणारी विविध यंत्रसामग्री विद्यार्थ्यांना पहावयास मिळाली. या औद्योगिक भेटीमध्ये संस्थेतील एकूण ५३ विद्यार्थी सहभागी झाले होते. या भेटीचे संयोजन प्रा. श्री आर. एस. चौधरी आणि प्रा. कु. जान्हवी प्रभुणे यांनी केले. ✻

## ✻ महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे ✻

## हिवाळी परीक्षा २०२४ निकाल

### मुद्रण पदविका प्रथम वर्ष



कु. अनिरुध्द गुळूमकर
७५.४१%
प्रथम क्रमांक



कु. ओंकार नरवडे
७१.४१%
द्वितीय क्रमांक



कु. शिवम मराठे
७०.८२%
तृतीय क्रमांक

### मुद्रण पदविका द्वितीय वर्ष



कु. आर्यन अकोले
८७.१८%
प्रथम क्रमांक



कु. विक्रांत माने
८६.७१%
द्वितीय क्रमांक



कु. संकेत इंगोले
८४.१२%
तृतीय क्रमांक

### मुद्रण पदविका तृतीय वर्ष



कु. रितु बोराटे
८४.७१%
प्रथम क्रमांक



कु. उज्वल शर्मा
८१.००%
द्वितीय क्रमांक



कु. मोनाली काळे
८०.४३%
तृतीय क्रमांक

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

**वार्षिक स्नेहसंमेलन**

शुक्रवार दि. २० डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन टिळक स्मारक मंदिर येथे संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. नितीन अहिर (कन्सल्टंट, न्यूटर्नस् ट्रेनर आणि कोच) हे उपस्थित होते. विविध स्पर्धांमधील प्रथम पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

स्नेहसंमेलनामध्ये विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर सामूहिक तसेच एकल नृत्ये सादर केली.

**संक्रांत सण उत्साहात साजरा**

मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५ रोजी संक्रांत हा सण मोठ्या उत्साहात पार पडला. सर्व विद्यार्थ्यांनी रंगीत कपडे परिधान केले होते. विद्यार्थ्यांना डब्यामध्ये गूळपोळी, तीळपोळी आणली होती. शाळेतर्फे सर्व विद्यार्थ्यांना तिळगुळाचे वाटप करण्यात आले.

शिशुगटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत पतंग चिकटविले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत ढगांचे चित्र काढून पतंग चिकटविले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत पतंगाच्या चित्रावर रंगीत कागदाचे गोळे चिकटवले.

**द्वितीय घटक चाचणी परीक्षा**

द्वितीय घटक चाचणी परीक्षा दि. १६ ते. २६ जानेवारी २०२५ दरम्यान पार पडली.

**प्रजासत्ताक दिन**

शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त शिशु गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत झेंड्याचे चित्र रंगविले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी झेंड्याच्या चित्रावर इयरबडच्या सहाय्याने केशरी व हिरव्या रंगाचे ठसे घेतले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी हाताच्या पंजाला केशरी व हिरवा रंग लावून चित्रकलेच्या वहीत त्याचे ठसे घेतले व मधोमध अशोक चक्र काढले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताकदिनाची माहिती दिली.

## प्राथमिक विभाग

**बुध्दिबळ खेळाच्या वर्गाची सुरूवात**

शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ पासून विद्यार्थ्यांसाठी जे. के. एक्सलन्स ॲकेडेमी यांच्या मार्गदर्शनाखाली बुध्दिबळ या खेळाचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

**आर्ट ऑफ लिव्हिंग वर्ग**

शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ रोजी सौ. मनीषा चंद्रा, सौ. स्वाती काळे, सौ. अनामिका माळवे व डॉ. सौ. मनीषा कोतवाल यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी आर्ट ऑफ लिव्हिंगचा वर्ग घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी यास उत्तम प्रतिसाद दिला.

**माता पालक इंग्रजी प्रशिक्षण वर्ग**

रविवार दि. ५ जानेवारी २०२५ पासून माता पालकांसाठी तीन महिन्यांचा इंग्रजी शिक्षण वर्ग शिक्षिका सौ. ऐश्वर्या तेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले.

**मेडिटेशन**

सोमवार दि. ७ जानेवारी २०२५ पासून शिक्षिका सौ. संज्योत दामले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी दररोज मेडिटेशन घेतले जात आहे.

### द्वितीय सत्र प्रथम लेखी परीक्षा

गुरूवार दि. १६ ते २३ जानेवारी २०२५ या कालावधीत द्वितीय सत्रातील प्रथम लेखी परीक्षा घेण्यात आली.

### अभिनंदनीय

शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ रोजी कब आणि बुलबलच्या विद्यार्थ्यांनी गर्ल्स गाईड आणि बॉइज स्काऊट हेड क्वार्टरस् यांनी आयोजित केलेल्या 'नो गॅस कुकींग' स्पर्धेत भाग घेतला होता. या स्पर्धेत बुलबुलच्या ६ जणींच्या संघाला प्रथम क्रमांक मिळाला. कबच्या ५ मुलांच्या संघाला तृतीय क्रमांक मिळाला. सहभागी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे -

| बुलबुल विद्यार्थिनी (मुली) | इ / तु |
|---|---|
| कु. युविका राठोड | २ री ड |
| कु. देवश्री इंगळे | २ री क |
| कु. श्रीयांशी वाकडे | २ री इ |
| कु. पूर्वी देशपांडे | २ री अ |
| कु. स्वरा शिंदे | २ री इ |
| कु. मनस्वी कोळेकर | २ री क |

**कब विद्यार्थी**

| | |
|---|---|
| कु. आशुतोष चिंकुटे | २ री अ |
| कु. कृष्णा जाट | २ री ब |
| कु. प्रजीत कुलकर्णी | २ री ड |
| कु. वेदांत कापसे | २ री क |
| कु. सार्थक यादव | २ री ड |

### तायक्वांदो स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे यश

रविवार दि. १९ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या द्वितीय तायक्वांदो चॅम्पियनशीप स्पर्धेत विद्यार्थ्यांनी शाळेत सुरू असलेल्या योधी तायक्वांदो ॲकेडेमीच्या मार्गदर्शनाखाली ४ सुवर्ण व ५ रजत पदके मिळवली. तसेच बेस्ट परफॉर्मन्स टीम आणि २ विद्यार्थ्यांना बेस्ट पोमसे परफॉर्मन्स हे बक्षिस मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | प्राप्त पदक |
|---|---|---|
| कु. अहिल्या घोरपडे | १ ली ब | सुवर्ण |
| कु. अंश ओव्हाळ | २ री ड | सुवर्ण |
| कु. शरण्या रेडेकर | २ री ड | सुवर्ण |
| कु. हरुषी दुडाकिया | ४ थी ब | सुवर्ण |
| कु. हर्ष रमावत | १ ली ड | रजत |
| कु. शिवांग शिंदे | १ ली इ | रजत |
| कु. मृण्मयी पाटील | २ री क | रजत |
| कु. मच्छिंद्र पवार | ५ वी ड | रजत |
| कु. उत्कर्ष दहिभाते | ६ वी अ | रजत |

### रोलर स्केटिंग चॅम्पियनशीप स्पर्धेतील यश

रविवार दि. १९ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथे झालेल्या प्रथम आमंत्रित खुली जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशीप स्पर्धेत एकूण ७०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत शाळेतील १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पैकी ८ विद्यार्थ्यांनी १ सुवर्ण, २ रजत व ५ कांस्य पदके मिळवली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | प्राप्त पदक |
|---|---|---|
| कु. सई कदम | ६ वी ब | सुवर्ण |
| कु. स्वरा पाटोळे | ३ री ड | रजत |
| कु. अंशुल बगाडे | ६ वी क | रजत |
| कु. शौर्य सुकाळे | २ री इ | कांस्य |
| कु. हेरंब परदेशी | ४ थी ड | कांस्य |
| कु. विरांश चंगेडिया | १ ली अ | कांस्य |
| कु. अमेय पवार | ४ थी ड | कांस्य |
| कु. आर्या तापकीर | २ री क | कांस्य |

### तिळगूळ समारंभ

शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ रोजी मकर संक्रांतीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे श्रीमान बाल गोविंददासजी, व्हाइस प्रेसिडेंट, इस्कॉन, पुणे व डायरेक्टर भक्तीवेद एज्युकेशन इंडिया हे लाभले होते. या प्रंसगी प्रमुख अतिथी श्रीमान भूषण कुमार चौधरीजी, सेक्रेटरी, भक्तीवेद रिसर्च सेंटर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांच्या सामुहिक श्लोक पठण व गवळण गायनाने झाली. तसेच काही विद्यार्थ्यांनी भगवद्गीतेतील १५ व्या अध्यायातील ५ श्लोक म्हटले. उपस्थित श्रीमान बाल गोविंददासजी, श्रीमान भूषण कुमार चौधरीजी, संस्थेचे पदाधिकारी यांचे स्वागत मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी केले.

श्रीमान बाल गोविंददासजी व श्रीमान भूषण कुमार चौधरीजी यांचा परिचय शिक्षिका सौ. तेजस्विनी आठल्ये यांनी करून दिला. श्रीमान बाल गोविंददासजी यांचा सन्मान कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. श्रीमान भूषण कुमार चौधरीजी यांचा सत्कार उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थी कु. अबीर मोहिते इ. ४ थी क, विद्यार्थिनी कु. प्रांजल साळेकर हिने हिंदीमधून मकर संक्रांतीची माहिती सांगितली.

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवलेल्या तसेच तायक्कांदो, स्केटिंग या खेळात विशेष यश मिळवलेल्य विद्यार्थ्यांना श्रीमान बाल गोविंददासजी व श्रीमान भूषण कुमार चौधरीजी यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

कार्यक्रमात बोलताना श्री. बाल गोविंददास जी यांनी भारतीय संस्कृती किती अभिमानास्पद आहे हे सांगून जीवनाची ५ तत्त्वे अंगिकारत जीवन जगावे हे सांगितले. विद्यार्थीदशेपासूनच अभ्यास व अध्यात्म यांची सांगड घातली तर पुढील प्रवास सुखकारक होतो याचे मार्गदर्शन केले.

याप्रसंगी संचालक श्री. सुनील रेडेकर, श्री. आनंद कुलकर्णी, प्रा. राजेंद्र कडुसकर आणि श्री. रमेश कुलकर्णी तसेच पर्यवेक्षिका सौ. मनीषा नाईक, शिक्षक प्रतिनिधी सौ. वैशाली डबीर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. केतकी पुजारी यांनी केले. आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन यांनी केले. शिक्षिका सौ. शिल्पा पाटील यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व विद्यार्थ्यांना तिळगूळाचे वाटप करण्यात आले.

## माध्यमिक विभाग

### शालेय संसद हिवाळी सत्र २०२४ - २५ मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

दि. २६ ऑक्टोबर २०२४ रोजी इ. ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांनी शालेय संसद हिवाळी सत्र २०२४ - २५ मध्ये सहभाग घेतला. एम. आय. टी. गुरुकुल शाळा कोथरुड, पुणे येथे हे सत्र संपन्न झाले. या सत्रात विद्यार्थ्यांना संसदेच्या कार्यक्रणालीची सर्वांगीण माहिती देण्यात आली.

### कानमंत्र आईबाबांसाठी

दि. ११ जानेवारी २०२५ रोजी इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी 'कानमंत्र आईबाबांसाठी' हे सत्र कुलगुरू वि. गं. तथा दादासाहेब केतकर सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रसिध्द वक्ते श्री. मनोज अंबिके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी पालकांनी मुलांशी मुक्त संवाद कसा साधावा, परस्परांविषयी आदर बाळगावा आणि परिणामकारक पालकांचे महत्त्वपूर्ण घटक कोणते आहेत तसेच उत्तम पालकत्व कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले.

### ॲडव्हेंचर क्लबचे उद्‌घाटन

दि. ११ जानेवारी २०२५ रोजी पुण्यातील प्रसिध्द गिर्यारोहक गट गार्डियन गिरीप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनियरिंग यांच्या सहकार्याने मुक्तांगण शाळेच्या ॲडव्हेंचर क्लबचे उद्‌घाटन करण्यात आले. या क्लबचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये साहस, गटकार्य व शारीरिक तंदुरुस्तीची भावना वाढवणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग व पर्यावरण याबद्दलची कुतुहलता आणि जागरुकता निर्माण करणे हा आहे.

### दामिनी मार्शल पथक यांच्याकडून मार्गदर्शन

दि. १८ जानेवारी २०२५ इ. ८वी व इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दामिनी मार्शल पथक (पोलिस विभाग)

यांच्याकडून मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

### तिकोणा किल्ल्यावर गिर्यारोहण

दि. १९ जानेवारी २०२५ रोजी ॲडव्हेंचर क्लबची पहिली मोहिम यशस्वीपणे पार पडली. यावेळी तिकोणा किल्ल्यावर गिर्यारोहण आयोजित केले होते. या ऐतिहासिक किल्ल्याचा विद्यार्थ्यांना नैसर्गिक सौंदर्याचा शोध व ट्रेकिंगचा थरार या गोष्टींचा परिपूर्ण अनुभव घेतला.

### तिळगूळ समारंभ

दि. २१ जानेवारी २०२४ रोजी मकरसंक्रांतीनिमित्त तिळगूळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रसिध्द किर्तनकार डॉ. चैतन्य महाराज देगलूरकर यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून श्री. वैभव जोशी तसेच उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. सुनील रेडेकर, श्री. रमेश कुलकर्णी, श्री. अमोल जोशी, प्रा. राजेंद्र कडुसकर, श्री. आनंद कुलकर्णी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांच्या गायन वृंदाने गायलेल्या ईशस्तवनाने झाली. उपस्थितांचे स्वागत प्र. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विभाग प्रमुख डॉ. सौ. मिनाक्षी अत्रे यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांनी अध्यात्म म्हणजे काय हे सोप्या भाषेत समजावून सांगितले. त्यांनी अभ्यास म्हणजे चिंतन, मनन हे विद्यार्थ्यांचे ध्येय आहे. याबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. वैदेही सोवनी यांनी उपस्थितांचे आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### विद्यार्थी आणि पालकांसाठी मार्गदर्शनपर सत्र

दि. २२ जानेवारी २०२५ रोजी इ. १०वी च्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले होते. प्र. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना एस. एस. सी. बोर्ड परीक्षेची तयारी कशी करावी, वेळेचे व्यवस्थापन कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले. या सत्रामध्ये विद्यार्थी आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

### प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ब्रिगेडिअर डॉ. सुनील बोधे (रिटायर्ड) तसेच संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी उपस्थित होते. ब्रिगेडिअर डॉ. सुनील बोधे (रिटायर्ड) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आर्मी आणि एअर विंगच्या एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या बँडच्या तालावर शानदार मार्च पास्ट सादर केला. संपूर्ण सभेने राष्ट्रगीत गायले. शाळेची सरचिटणीस विद्यार्थिनी कु. सिया पुजारी इ. १० वी क हिने भारताच्या घेतलेल्या प्रतिज्ञेची पुनरावृत्ती विद्यार्थ्यांनी केली. विद्यार्थ्यांच्या गायन वृंदाने देशभक्तीपर गीत सादर केले. प्र. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पर्यवेक्षिका सौ. विजया काळे यांनी प्रमुख पाहुणे ब्रिगेडिअर डॉ. सुनील बोधे (रिटायर्ड) यांचा परिचय करून दिला. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी ब्रिगेडिअर डॉ. सुनील बोधे (रिटायर्ड) यांचा सत्कार केला.

एन. सी. सी. शिबिरामध्ये ज्यांनी वेगवेगळी पारितोषिके मिळवली आहेत अशा आर्मी आणि एअर विंगच्या एन. सी. सी. कॅडेटसना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बॅच देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी भारताचा इतिहास सांगून आपण इतिहासाकडून शिकवण घेऊन पुढील वाटचाल केली पाहिजे. तसेच अध्यात्माची जोड देऊन व विविध संतांचे दाखले देत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावर्षीची सांस्कृतिक आणि सामन्य चॅम्पियनशीप ट्रॉफी बोस हाऊसने जिंकली. बोस हाऊसच्या विद्यार्थ्यांना शिक्षिका सौ. कुमुदिनी पवार यांनी

मार्गदर्शन केले. पर्यवेक्षिका जयती नरवणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### दुसरी घटक चाचणी परीक्षा

इ. ७ वी ते इ. ९ वी ची दुसरी घटक चाचणी परीक्षा दि. २७ ते ३१ जानेवारी २०२५ या दरम्यान घेण्यात आली. तसेच इ. १० वी च्या विद्यार्थ्यांची बोर्ड सराव परीक्षा दि. ३ ते १४ जानेवारी २०२५ या कालावधीत घेण्यात आली.

### ओपन डे

दि. २५ जानेवारी २०२५ रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या बोर्ड सराव परीक्षेच्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना आणि पालकांना दाखवण्यात आल्या व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.

### एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा निकाल

दि. २५ ते २८ सप्टेंबर २०२५ दरम्यान झालेल्या शासकीय एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल खालील प्रमाणे

### एलिमेंटरी चित्रकला परीक्षा

| | |
|---|---|
| एकूण प्रविष्ट विद्यार्थी | १३४ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | १३४ |
| एकूण निकाल | १०० % |

### इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा निकाल

| | |
|---|---|
| एकूण प्रविष्टविद्यार्थी | १३३ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | १३२ |
| एकूण निकाल | ९९% |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन !**

### अभिनंदनीय

एन. सी. सी. आर्मी विंग कॅडेट कु. सृष्टी धनावडे इ. ९ वी अ हिची २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथे महाराष्ट्र सांस्कृतिक संचालनालयातर्फे सादर होणाऱ्या समूह नृत्य स्पर्धेत प्रमुख नर्तिका म्हणून निवड झाली. कु. सृष्टी धनावडे हिला लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, एन. सी. सी. चे महासंचालक लेफ्टनंट जनरल गुरूब्रिपाल सिंग आणि भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी अशा व्यक्तींच्या घरी आमंत्रित करण्यात आले. **कु. सृष्टी धनावडे हिचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

***

### मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०




दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती निमित्त आयोजित पदयात्रेत सहभागी झालेला विद्यार्थ्यांचा गट आणि शिक्षिका

## ❋ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ❋



दि. २१ जानेवारी २०२५ रोजी मकर संक्रांतीनिमित्त आयोजित तिळगुळ समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कीर्तनकार डॉ. चैतन्यमहाराज देगलूरकर यांचे स्वागत करताना संचालक श्री. सुनील रेडेकर, समवेत डावीकडून अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. अमोल जोशी, प्रा. राजेंद्र कडुसकर आणि श्री. आनंद कुलकर्णी, .............................. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. रमेश कुलकर्णी आणि प्र. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी



दि. २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुणे ब्रिगेडियर डॉ. सुनील बोधे (रिटायर्ड) यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, प्रा. राजेंद्र कडुसकर आणि श्री. सुनील रेडेकर, प्र. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी आणि मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली



ब्रिगेडियर डॉ. सुनील बोधे (रिटायर्ड) यांच्या हस्ते विविध स्पर्धा व उपक्रम यासाठी असणारा जनरल विजेतेपदाचा चषक आणि सांस्कृतिक पदाचा चषक स्वीकारताना बोस हाऊसचे विद्यार्थी, समवेत प्र. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### पारितोषिक वितरण समारंभ

दि. २५ जानेवारी २०२५ रोजी विद्याभवन शाळेच्या सेमिनार हॉलमध्ये पूर्व प्राथमिक सेमी विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती तेजस्विनी अधिकारी (पालक - मूल समुपदेशिका) व विशेष अतिथी श्रीमती रेवा जोशी (हितचिंतक, देणगीदार) या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरूवातीला पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. 'नमो नमो रे शंकरा' हे ईशस्तवन व स्वागतम, सुस्वागतम या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर वार्षिक अहवाल सादरीकरण श्रीमती सोनाली ढेंगरे व श्रीमती वंदना आवळे यांनी केले.

श्रीमती शुभांगी जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते श्रीमती तेजस्विनी अधिकारी व कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते श्रीमती रेवा जोशी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्रीमती लक्ष्मी, पूजा फरिया, पालक प्रतिनिधी यांचा श्रीमती शुभांगी जाधव यांनी पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला.

प्रमुख पाहुण्या श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांनी आपल्या भाषणातून मुलांचा आहार कसा असावा? पालकांची जबाबदारी काय? मुलांना मोबाईलपासून कसे दूर ठेवावे? असे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यानंतर पारितोषिक वितरण करण्यात आले. बक्षिसपात्र विद्यार्थ्यांच्या नावांचे वाचन श्रीमती स्नेहल थोरात व श्रीमती प्रणिती सावंत यांनी केले.

प्रमुख पाहुण्या व इतर मान्यवरांच्याहस्ते सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरीत करण्यात आली. श्रीमती नेहा कर्णिक यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नयना बढे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्'ने करण्यात आली.

### वार्षिक क्रीडा बक्षीस समारंभ

'जीवन हा एक खेळ आहे. जुन्या नव्या संस्कृतीचा हाच खरा मेळ आहे'.

दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक समारंभ विद्याभवन शाळेच्या पटांगणात साजरा झाला. शैक्षणिक वर्षात धावणे, हर्डल रेस, तोल सांभाळणे, मल्टी टास्किंग रेस इ. विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देण्यात आले. बक्षीस देण्यासाठी छोट्या शिशुच्या दोन पालक प्रतिनिधी श्रीमती पल्लवी मोरे व श्रीमती पूजा व्हनकलस तसेच मोठ्या शिशुवर्गाच्या श्रीमती प्रतीक्षा चाळके व श्रीमती प्राजक्ता सावंत या उपस्थित होत्या. या बक्षीस वितरण सोहळ्यासाठी समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव व इंग्रजी माध्यमाच्या पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया याही उपस्थित होत्या. यांच्या हस्तेही बक्षिस पात्र विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरवण्यात आले. अशा प्रकारे पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाचा क्रीडा बक्षीस समारंभ आनंदात साजरा झाला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### पारितोषिक वितरण समारंभ

विभागाचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ रोजी उत्साह आणि आनंदाच्या वातावरणात संपन्न झाला. या समारंभासाठी श्रीमती सरला नरेंद्रन प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. श्रीमती लक्ष्मी गोपाळकृष्णन विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे यांनीही या कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाची सुरूवात परंपरागत दीपप्रज्वलनाने झाली, दीपप्रज्वलन हे ज्ञान आणि प्रकाशाचे प्रतिक आहे. त्यानंतर ज्युनिअर आणि सिनियर के. जी. च्या विद्यार्थ्यांनी सुरेल प्रार्थना गीत सादर केले. नंतर, चिमुकल्यांनी आकर्षक स्वागत नृत्य सादर करून मान्यवरांचे स्वागत केले, ज्यामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय आणि उत्साही झाले.

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे ज्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले अशा २२० हून अधिक विद्यार्थ्यांचा सत्कार, त्यांच्या मेहनतीचे कौतुक उपस्थित मान्यवर, पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त पणे टाळ्यांच्या गजराने केले.

कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताच्या स्फूर्तीदायक सादरीकरणाने झाली. ज्यामुळे उपस्थितांची देशभक्तीची भावना वृद्धिंगत झाली. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या शिक्षण, चिकाटी आणि यशाचा उत्सव ठरला आणि संस्थेच्या नवोदित प्रतिभावंतांच्या जडणघडणीसाठी असलेल्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा ठरला.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

### पारितोषिक वितरण समारंभ

विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजता पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून माजी मुख्याध्यापिका श्रीमती रुक्मिणी श्रीकृष्ण दीक्षित व श्रीमती वंदना अरुण गोखले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रूपल पालकर यांनी केले. इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थिनींनी ईश्वस्तवन, स्वागतगीत आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी प्रास्ताविक भाषण, आभार प्रदर्शन केले. 'वंदे मातरम्' कार्याक्रमाने शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना वृद्धिंगत केली. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे श्री. डाफळे यांनी वाचली. पालक व विद्यार्थ्यांना मोबाईल वापराच्या मर्यादा आणि आरोग्य व आहाराकडे लक्ष देण्याचा संदेश दिला गेला.

या समारंभामधून शाळेतील विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यातील एकात्मता आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या दिशेने एक प्रगट व सकारात्मक पाऊल उचलले गेल्याचे दिसून आले.

### शालेय वार्षिक तपासणी

मंगळवार दि. २८.१.२०२५ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेची वार्षिक तपासणी करण्यात आली. शिक्षण विभागातील अधिकारी शिक्षण निरीक्षक (BO) श्रीमती भवारी, श्रीमती ललिता शिंदे मुख्याध्यापिका अभ्युदय शाळा, श्रीमती अपर्णा फर्नांडिस, मुख्याध्यापिका सरस्वती विद्यालय उपस्थित होत्या.

निरीक्षणादरम्यान निरीक्षकांनी विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी विषयाच्या कविता गायला सांगितल्या. पाढे म्हणायला सांगितले. इंग्रजी शब्दांचे वाचन घेतले. विद्यार्थ्यांकडून बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकाराची उदाहरणे फळ्यावर सोडवून घेतली. निरीक्षक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शिस्त आणि शैक्षणिक कौशल्यांनी प्रभावित झाले. निरीक्षकांनी सर्व शिक्षकांचे सहकार्य आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन राखण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

मुख्याध्यापक श्री. सुदाम कणसे यांनी निरीक्षक पथकाचे त्यांच्या मौल्यवान निरीक्षणासाठी आणि अभिप्रायासाठी आभार मानले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### पारितोषिक वितरण समारंभ

विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळेचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून माध्यमिक इंग्रजी विद्यालयाच्या माजी प्राचार्या श्रीमती विजया गणेश व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या माजी मुख्याध्यापिका व समन्वयिक श्रीमती शुभांगी जाधव या उपस्थित होत्या. अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती लक्ष्मी गोपाळकृष्णन, श्रीमती पूजा फरिया आणि प्राथमिक मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे हेही मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रार्थना गीताने झाली, तर स्वागतगीत इ. ३री व ४थीच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. पालक-शिक्षक संघ (PTA) आणि शाळा व्यवस्थापन समिती (SMC) सदस्यांकरवी बक्षिसे वितरित केली गेली. श्रीमती कविता पुजारी आणि श्री. दीपक निचित यांनी अनुक्रमे इयत्ता पहिली-दुसरी व तिसरी-चौथीच्या विजेत्यांच्या नावांच्या यादीचे वाचन केले. शाळेच्या वार्षिक प्रगतीचा अहवाल श्रीमती स्वप्ना गायकवाड यांनी उत्कृष्टरीत्या सादर केला. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे एक भव्य ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरण होते, ज्यात शैक्षणिक वर्षातील सर्व उपक्रम मांडले गेले. सूत्रसंचालन श्रीमती चंदा भटकर यांनी केले आणि आभार प्रदर्शन श्रीमती मयुरी कदम यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत भविष्यात अशाच जिद्दीने यश मिळवण्याचा सल्ला दिला.

या समारंभामधून शाळेतील विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यातील एकात्मता आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या दिशेने एक प्रगट व सकारात्मक पाऊल उचलले गेले असल्याचे दिसून आले.

### वार्षिक निरीक्षण अहवाल

पुणे विद्यार्थी गृह विद्यालय प्राथमिक इंग्रजी शाळेचे वार्षिक निरीक्षण शिक्षण विभागाने नियुक्त केलेल्या विविध शाळांमधील मान्यवर मुख्याध्यापिका यांच्या पॅनेलने यशस्वीरीत्या पार पाडले. निरीक्षण पथकात खालील मान्यवरांचा समावेश होता.

| | |
|---|---|
| श्रीमती मंदीपकौर विर्दी | श्री दशमेश पब्लिक स्कूल |
| डॉ. कुसुम बिष्ट | रामकली देवी हायस्कूल |
| श्रीमती अल्पा पटेल | के. व्हि. के. प्रायमरी स्कूल |
| श्रीमती कीर्ती पानसरे | आर. एन. शेठ हायस्कूल |

निरीक्षणाचा उद्देश शाळेच्या शैक्षणिक कामगिरीचे आणि अधिकृत नोंदींचे मूल्यांकन करणे हा होता. पॅनलने विविध वर्गखोल्यातील उपक्रम आणि प्रशासकीय पद्धतींचे निरीक्षण केले. जेणेकरून शाळा, शिक्षण आणि नोंद व्यवस्थापनात उच्च दर्जा राखत आहे याची त्यांना खात्री पटली.

निरीक्षणादरम्यान निरीक्षकांनी विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना कविता वाचायला सांगितल्या आणि तत्काळ तपासणीसाठी श्रुतलेखन चाचणी घेतली. याशिवाय, त्यांनी गणिताचा सराव करताना विद्यार्थ्यांना बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकारची उदाहरणे फळ्यावर सोडवताना पाहिले.

निरीक्षक विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, शिस्त आणि शैक्षणिक कौशल्यांनी प्रभावित झाले. त्यांनी विशेषतः विद्यार्थ्यांच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या उत्साहाचे कौतुक केले. शिक्षकांच्या काटेकोर नियोजनाचे आणि निष्ठेचे प्रतिबिंब विद्यार्थ्यांच्या कामगिरीत दिसून आले. निरीक्षकांनी सर्व शिक्षकांचे सहकार्य आणि विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन राखण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

निरीक्षणाचा समारोप मुख्याध्यापिका यांच्या सकारात्मक टिपणीसह झाला. त्यांनी शाळेच्या सुव्यवस्थित आणि शिस्तबद्ध कार्यप्रणालीची प्रशंसा केली. त्यांनी शाळेच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेची दखल घेतली आणि विद्यार्थ्यांसाठी पोषक आणि शिस्तबद्ध वातावरण निर्माण केल्याबद्दल कौतुक केले.

मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी निरीक्षक पथकाचे त्यांच्या मौल्यवान निरीक्षणांसाठी आणि अभिप्रायासाठी आभार मानले. तसेच, त्यांनी शाळेच्या आणखी एका यशस्वी निरीक्षणासाठी सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे उत्कृष्ट टीमवर्क आणि निष्ठेसाठी मनःपूर्वक आभार मानले.

निरीक्षण गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उच्च शैक्षणिक दर्जा राखण्याच्या शाळेच्या बांधिलकीला अधोरेखित करते.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**पारितोषिक वितरण समारंभ**

दि. २२ जानेवारी २०२५ रोजी विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुणे विद्याभवन शाळेच्या माजी उपमुख्याध्यापिका श्रीमती रजनी तायवाडे, माजी मुख्याध्यापिका श्रीमती प्रिया नाईक, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष श्री. कृ.ना. शिरकांडे, विद्याभवन इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील व श्रीमती सरला नरेंद्रन व मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली.

इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थिनींनी ईश्वस्तवन व स्वागतगीत सादर केले.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी प्रमुख पाहुण्या व विशेष अतिथी यांचा परिचय करून दिला.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्या श्रीमती रजनी तायवाडे यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विशेष अतिथी श्रीमती प्रिया नाईक यांचा सत्कार पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे यांच्या हस्ते करण्यात आला.

इ. ७वी च्या विद्यार्थिनी कु. संस्कृती सरगर व आसावरी पाटील यांनी प्रशालेत वर्षभर राबवलेल्या स्पर्धा, उपक्रम, मिळवलेले यश व पारितोषिक यांचा

अहवाल संवाद रूपाने सादर केला.

विशेष अतिथी माजी मुख्याध्यापिका श्रीमती प्रिया नाईक यांनी स्पर्धेत सहभाग घेणे महत्त्वाचे आहे असे सांगितले. तसेच अभ्यास व खेळ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्याप्रमाणे अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले आहे त्याप्रमाणे दररोज खेळासाठी १ तास द्यावा. त्याने मन प्रसन्न होते. टी.व्ही. व मोबाईलचा वापर कमी करा. आपल्या कला गुणांना वाव द्या. विविध क्षेत्र पादाक्रांत करा. गोष्टीची पुस्तके वाचा. मधमाशीप्रमाणे ज्ञान गोळा करा, उत्तम नागरिक बना व आई वडिलांची आज्ञा पाळा असे मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुण्या श्रीमती रजनी तायवाडे यांनी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक तर केलेच परंतु सूत्र संचालन ते आभार प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थिनींचे सुद्धा भरभरुन कौतुक केले.

पारितोषिक न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी निराश न होता यशाच्या दिशेने वाटचाल करावी. निराशा हीच माणसाला बळ पुरवते. कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. ग्रीक तत्त्ववेत्ता डिमॉस्थेनिस यांच्या छोटया कथेतून सकारात्मकतेने परिस्थितीवर मात कशी करावी, जिद्द व चिकाटीने प्रगती कशी साध्य करावी हे सांगितले.

आर्थिक परिस्थिती चांगली नसतानाही विद्या संपादन करणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद द्रौपदी मुर्मू यांच्याकडून प्रेरणा घ्यायला हवी. महान लोकांची चरित्रे वाचावित तसेच, 'विद्या विनयेन शोभते' हे सुवचन पराकोटीची विद्वत्ता असणारे भारताचे पहिले स्थापत्य शास्त्रज्ञ विश्वेश्वरैया यांच्या गोष्टीच्या माध्यमातून समजावून सांगितले. त्याचबरोबर आपले विचार व उच्चार यावरून आपले संस्कार ठरत असतात याची जाणीव असावी. भाषा अरेरावीची असता कामा नये असेही सांगितले.

जिद्द, एकाग्रता, संयम, मनाची शांतता व ध्येय निश्चित असल्यामुळे डी. गुकेश वयाच्या १८ व्या वर्षी बुद्धिबळ विश्वविजेता बनू शकला म्हणून, विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन आपल्यातील वेगळेपण ओळखून गरुडझेप घ्या असे बहुमोल मार्गदर्शन केले.

त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या १०वी-१२वी, प्रथम ३ विद्यार्थी, NMMS शिष्यवृत्ती, इ.५वी/८वी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व चालू शैक्षणिक वर्षातील विविध स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. मानसी नायकोडी व कु. दुर्गा पाटील, इ. १०वी यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार विद्यार्थिनी कु. ईश्वरी एरंडे, इ. ६वी हिने मानले. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्' ने झाली.

**प्रजासत्ताक दिन**

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता प्रमुख पाहुणे संस्थेचे हितचिंतक श्री. गिरीश रामचंद्र जोशी यांच्या हस्ते झेंडावंदन दिमाखात पार पडले. राष्ट्रगीत व ध्वजगीताने ध्वजाला सलामी देण्यात आली.

मराठी व इंग्रजी माध्यमाच्या इ.९वी/१०वी च्या मुलांच्या व मुलींच्या R.S.P. ट्रूप ने संचलन करून प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली.

इंग्रजी माध्यमाच्या इ.७वी च्या विद्यार्थ्यांनी सांघिक कवायत सादर केली. मराठी माध्यमाच्या इ.७वी ते ९वी च्या विद्यार्थिनींनी संगीतमय योग प्रात्याक्षिक सादर केले. तसेच दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व भाषणे सादर केली.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर प्रमुख पाहुणे यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेवा जोशी यांचा सत्कार प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन केला.

त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी यांच्या हस्ते माध्यमिक शालांत परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुणप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. 'तुकाराम अन्याबा मोहिते पुरस्कार', 'आदर्श शिक्षक पुरस्कार' माध्यमिक मराठी विभागाच्या शिक्षिका श्रीमती संगीता बोऱ्हाडे यांना देण्यात आला.

तसेच Best Cadet Award मराठी माध्यमाच्या इ. १० वी चा विद्यार्थी कु. ओमसाई मोरे व विद्यार्थिनी कु. सोनम गोरे यांना देण्यात आले.

प्रमुख पाहुणे यांनी राजा, प्रजा व अधिकारी यांचे नाते जर निकोप असेल तरच, प्रजासत्ताक दिन खऱ्या अर्थाने साजरा करता येईल यासाठी त्यांनी छोट्या छोट्या भारतीय व ब्रिटिशकालीन कथांमधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व भारतीय संविधान व कर्तव्यांविषयी जागरुक असावे असे ही सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अस्मिता चौधरी, श्रीमती ज्योती पाटील व श्रीमती स्नेहा गंगाधरे यांनी केले.

**इ. १०वी निरोप समारंभ**

सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ रोजी मराठी माध्यमाच्या इ.१०वी चा निरोप समारंभ प्रमुख पाहुणे संस्थेचे हितचिंतक श्री. गिरीश रामचंद्र जोशी, त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेवा गिरीश जोशी, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, सर्व शिक्षकवृंद व परीक्षेला सामोरे जाणारे सर्व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

श्रीमती नंदा पोखरकर यांनी सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे स्वागत केले. उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री. गिरीश रामचंद्र जोशी व त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेवा गिरीश जोशी यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर इ. १०वी च्या विद्यार्थ्यांनी शाळेबद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. तसेच उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, श्रीमती नंदा पोखरकर, श्रीमती मीनल भोळे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा. समाजाचे शिष्टाचार पाळा. निरीक्षण शक्ती प्रबळ करून सुजाण नागरिक बना. १०वी नंतरची मोठी सुटी स्वतःला आजमावण्यासाठी असून स्वतःची शक्ती शोधा, कौशल्य शोधा असे मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे श्री. गिरीश रामचंद्र जोशी यांनी आपल्या भाषणातून गुरू द्रोणाचार्य व एकलव्य यांच्या कथेतील एकलव्याने ज्याप्रमाणे एकाग्रता साधून आपले ध्येय साध्य केले त्याप्रमाणे तुम्ही आजच्या आधुनिक युगातील एकलव्य आहात, एकलव्याप्रमाणे एकाग्रता साधा व आपले ध्येय साध्य करा.

आईवडिलांचा आदर करा. कामात प्रामाणिकपणा ठेवा. जे जे उत्तम त्याचा अंगिकार करा. असे मोलाचे मार्गदर्शन केले. श्रीमती सुनिता वायकर यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली

**सलाम बॉम्बे फाऊंडेशन - Happy Mind**

शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी सलाम बॉम्बे फाऊंडेशन व विद्याभवन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ७वी/८वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'Happy Mind' या विषयावरील चित्रफित व व्याख्यान यांचे आयोजन करण्यात आले होते.

आत्मविश्वास वाढवणे, सकारात्मक विचारसरणी विकसित करणे, तणाव व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य टिकवणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इ. ७वी/८वी चे सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

**शिष्यवृत्ती व्याख्यान**

दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ५वी च्या स्कॉलरशिप विद्यार्थ्यांसाठी सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत तर ८वी स्कॉलरशिप विद्यार्थ्यांसाठी सकाळी १०.१५ ते १२.३० या वेळेत मरोळ महानगरपालिका मराठी शाळा क्र.१ तील शिक्षक श्री. विनय सदानंद वर्तक (M.A. B.Ed) यांचे गणित व बुद्धिमत्ता या विषयाचे व्याख्यान आयोजित केले होते.

**माजी विद्यार्थी मंडळ शुद्धलेखन हस्ताक्षर स्पर्धा**

दि. ६ फेब्रुवारी २०२५ रोजी माजी विद्यार्थी मंडळ आयोजित श. गो. केतकर शुद्धलेखन हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| ५वी | कु. सुजल किरण बिल्ला | प्रथम |
| | कु. दिशा विशाल घोलप | द्वितीय |
| | कु. आराध्या योगेश करंडे | तृतीय |
| ६वी | कु. प्रितिका अमोल गोडसे | प्रथम |
| | कु. अनुज चंद्रकांत काळे | द्वितीय |
| | कु. शिवम महेश कवटे | तृतीय |
| ७वी | कु. संस्कृती संजय सरगर | प्रथम |
| | कु. आसावरी अमोल पाटील | द्वितीय |
| | कु. वैष्णवी आप्पाराव केदार | तृतीय |
| ८वी | कु. अदिती गणेश गावडे | प्रथम |
| | कु. सक्षम योगेश पैकडे | द्वितीय |
| | कु. आर्या सुनील साळवी | तृतीय |

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

विद्याभवन हायस्कूल नं. २ चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार दि. २३.१.२०२५ रोजी शाळेच्या सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाला.

सदर कार्यक्रमास श्रीमती सुनिता भिडे या प्रमुख पाहुण्या व श्रीमती अनुराधा मेहेंदळे या सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृष्णाजी शिरकांडे, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, विद्याभवन हायस्कूल व हितचिंतक श्री. गिरीश जोशी, उपमुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार तसेच सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला पाहुण्यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी शाळेच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. सन्माननीय अतिथी श्रीमती सुनिता भिडे व श्रीमती अनुराधा मेहंदळे यांनी विद्यार्थ्यांच्या शालेय प्रगतीची प्रशंसा केली. पारितोषिक वितरण समारंभ हा विद्यार्थ्यांसाठी आनंदाची पर्वणी असते. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात उपलब्ध होणाऱ्या संधीचा सदुपयोग करावा. शाळेचे व पालकांचे नाव उज्ज्वल करावे, असे सांगून विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यानंतर प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कु. अनुष्का गोपाळे या विद्यार्थिनीने सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. शेवटी 'वंदेमातरम्' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### १०वी निरोप समारंभ

विद्याभवन नं. २ चा इ. १०वी चा निरोप समारंभ सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ रोजी शाळेच्या सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाला.

सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. डी. बी. बोऱ्हाडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन सर्व शिक्षक आणि कै. कु. नेहा पाटील या विद्यार्थीनीचे पालक श्री. कृष्णा किरण पाटील आणि श्रीमती तृप्ती पाटील उपस्थित होते.

श्रीमती पद्मिनी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील यांनी अतिथींचे स्वागत केले आणि त्यांचा परिचय करून दिला. नंतर विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी कै. कु. नेहा पाटील हिच्या आईने आपल्या भाषणातून शाळेबद्दल ऋण व्यक्त केले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीबद्दल मार्गदर्शन केले आणि शुभेच्छा दिल्या. त्यानंतर प्रमुख अतिथी श्री. डी. बी. बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर आदर्श पुरस्कार प्राप्त विद्यार्थिनी कु. मुद्रा देवगिरकर हिने आभार प्रदर्शन केले तर 'वंदेमातरम्' या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

***

**✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻**







पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभाग वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा प्रसंगी प्रमुख पाहुण्या श्रीमती तेजस्विनी अधिकारी व विशेष अतिथी श्रीमती रेवा जोशी यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना विद्यार्थिनी

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ※




पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण प्रसंगी पालक प्रतिनिधी श्रीमती प्राजक्ता सावंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल देताना



शालेय वार्षिक तपासणी प्रसंगी उपस्थित अधिकारी शिक्षण निरीक्षक (**BO**) श्रीमती भवारी, मुख्याध्यापिका श्रीमती शिंदे, मुख्याध्यापिका श्रीमती फर्नांडिस व मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे




वार्षिक निरीक्षण शिक्षण विभाग पथकातील मान्यवर श्रीमती मंदीपकौर विर्दी, डॉ. कुसुम बिष्ट, श्रीमती अल्पा पटेल, श्रीमती कीर्ती पानसरे व मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ※




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या श्रीमती विजया गणेश (माजी प्राचार्या), विशेष अतिथी श्रीमती शुभांगी जाधव (माजी मुख्याध्यापिका) यांच्या समवेत डावीकडून कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्रे बोऱ्हाडे, श्रीमती लक्ष्मी, श्रीमती पूजा फरिया, श्रीमती अनघा सावंत



माध्यमिक इंग्रजी विभाग वार्षिक पारितोषिक वितरण ↑ समारंभ प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुण्या श्रीमती सुनिता भिडे, श्रीमती अनुराधा मेहंदळे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व आदी मान्यवर



←
दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजास्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी, त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. रेवा जोशी, अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील आदी मान्यवर

# नेरूळ शाखा, नवी मुंबई

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**सावित्रीबाई फुले जयंती**

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांच्या शुभहस्ते सावित्रीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या ओव्या सुंदर चालीत गायल्या. विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून सावित्रीबाईंचे शैक्षणिक व सामाजिक कार्य सविस्तर सांगितले. 'होय मी सावित्री बोलतेय' या विषयावर कु. काव्या कातळे हिने एकपात्री अभिनय सादर केला. काही विद्यार्थ्यांनी गाण्यातून सावित्रीबाईंची महती गायली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाईंच्या कार्याचे मोठेपण सांगितले. 'स्त्री शिक्षणाचे रोप लावणाऱ्या, सन्मानाने जगायला शिकवणाऱ्या, पाऊल पुढे टाकायला सांगणाऱ्या सावित्रीबाईंचा वसा आपण पुढे चालवू या' असे सांगून बालिकादिनाच्या शुभेच्छा दिल्या

**अभिनंदनीय**

✻ नवी मुंबई महानगरपालिका समाज विकास विभागातर्फे दि. ३ जानेवारी २०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा दिनेश मिसाळ यांना निबंधलेखन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. वनमंत्री नामदार गणेशजी नाईक, आमदार श्रीमती मंदाताई म्हात्रे, नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील पवार, शिक्षणाधिकारी श्रीमती अरुणा यादव या मान्यवरांच्या उपस्थितीत माजी खासदार डॉ. संजीवजी नाईक यांच्या शुभहस्ते मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांना चषक व रोख रक्कम रु. ३,०००/- देऊन गौरविण्यात आले.

**मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

✻ दि. १२ जानेवारी २०२५ रोजी श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ न्यू बॉम्बे सीसाईड यांच्यातर्फे विज्ञान प्रदर्शन खोज ६ या स्पर्धेचे आयोजन वाशी येथे करण्यात आले. विद्याभवन शाळेतून ज्युनिअर गटात इ. ७वी च्या कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ व कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे या विद्यार्थिनींनी मानसिक आरोग्य या विषयावर प्रकल्प सादर केला. मानसिक आरोग्य का बिघडते? ते बिघडू नये यासाठी आपण काय करावे? या विषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे रोख रक्कम रु. १०,०००/- पारितोषिक मिळाले. विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती राधिका भोसले यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन!

**कु. विभूती गुंजाळ व कु. वेदश्री राक्षे यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

✻ समग्र शिक्षा अभियानांतर्गत महावाचन उत्सव २०२४ या उपक्रमात कु. काव्या किरण जाधव हिने अ गटातून (इ. ३री ते इ. ५वी) जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. मी वाचलेले पुस्तक व त्यावर माझे मत या विषयावर लेखन करून काव्याने जिल्हा स्तरावर बाजी मारली. काव्याच्या या यशाबद्दल कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### कोटक एज्युकेशन सोसायटी तर्फे प्रशिक्षणाचे आयोजन

कोटक एज्युकेशन सोसायटी आयोजित एज्युकेशन टुडे, सोसायटी टुमारो या विषयावर प्रशिक्षण दि. ५ जानेवारी २०२५ ते ७ जानेवारी २०२५ या कालावधीत पाचगणी येथे घेण्यात आले. सदर प्रशिक्षणास मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा दिनेश मिसाळ व शिक्षिका श्रीमती मेघाराणी दिनेश जोशी या उपस्थित होत्या. पाचगणी याठिकाणी तीन दिवसीय प्रशिक्षणात व्यक्तिमत्त्व विकासाबाबत विविध गोष्टींचे प्रशिक्षण देण्यात आले.

### शिक्षणमंत्री व शिक्षक सुसंवाद

दि. ६ जानेवारी २०२५ रोजी मंत्रालयाजवळील जंजिरा या बंगल्यात शिक्षणमंत्री दादाजी भुसे व शिक्षक यांच्यामध्ये सुसंवादाचे आयोजन करण्यात आले. या संवादात शिक्षिका श्रीमती कविता विनय तेंडुलकर यांना शाळेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. या सुसंवादात मुंबई व ठाणे जिल्ह्यातील निवडक शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मा. शिक्षणमंत्री दादाजी भुसे तसेच राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक श्री. राहुल रेखावार व इतर मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. श्रीमती कविता तेंडुलकर यांनी पुणे विद्यार्थी गृह संस्था, माजी विद्यार्थी मंडळ व नेरुळ शाखेतील विद्याभवन शाळेच्या प्रगतीच्या महत्त्वपूर्ण बाबी सांगितल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेचे असलेले स्वतंत्र ॲप, स्पोर्टस् ॲकॅडमी व इतर सर्व महत्त्वपूर्ण गोष्टी थोडक्यात स्पष्ट केल्या.

### शिक्षण परिषद

दि. ११ जानेवारी २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ४, बेलापूर याठिकाणी शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रमास श्रीमती कविता विनय तेंडुलकर या उपस्थित होत्या. विस्तार अधिकारी श्रीमती रेखा पाटील यांच्या उपस्थितीत ही परिषद आयोजित करण्यात आली. याप्रसंगी अनेक शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. या परिषदेत निपुण महाराष्ट्र हॅकेथॉन स्पर्धा, रंगोत्सव, संविधान जागरुकता व संविधान वर्ष साजरे करणे इ. विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली.

### स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती

दि. १३ जानेवारी २०२५ रोजी विद्याभवन शालेय सभागृहात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मेघाराणी जोशी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. कु. वेदिका कणसे व कु. ज्ञानेश्वरी अडसूळ यांनी जिजाऊंच्या ओव्या गायल्या. कु. उल्का झगडे हिने आपल्या भाषणातून स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची ओळख करून दिली. इ. ६वी च्या विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ या गाण्यावर नृत्य सादर केले. श्रीमती नूतन गवांदे यांनी स्वामी विवेकानंद व जिजाऊ यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. श्रीमती मेघाराणी जोशी यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाविषयी मार्गदर्शन केले. आपल्यातील वाईट गुणांचा त्याग करून सद्‌गुण जोपासा असा संदेश दिला. कु. उल्का झगडे हिने उपस्थितांचे आभार मानले.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०२४-२५

दि. २१ जानेवारी २०२५ रोजी विद्याभवन पूर्व-प्राथमिक व प्राथमिक मराठी शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शालेय सभागृहात मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून साहित्यिक व कवी श्री. साहेबरावजी ठाणगे हे उपस्थित होते. अतिथी व मान्यवरांच्या हस्ते गणेशपूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सुमधूर अशा आवाजात व मंगलमय वातावरणात ईशस्तवन व स्वागतगीत गायले गेले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा दिनेश मिसाळ यांनी अतिथींचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, भेटवस्तू व सन्मानचिन्ह देऊन अतिथींचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृ. ना. शिरकांडे, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, श्रीमती शोभा लवटे, पालक प्रतिनिधी श्रीमती पूजा दुर्गवले, विद्यार्थी प्रतिनिधी, शिक्षकवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा, उपक्रम, कार्यक्रम व शालेय प्रगतीचा अहवाल विद्यार्थ्यांच्या संवादरूपी चित्रफितीतून सुंदररित्या सादर करण्यात आला. अहवालाचे लेखन श्रीमती नूतन गवांदे व सादरीकरण श्रीमती मेघाराणी जोशी यांनी केले. वाचन कु. विभूती गुंजाळ व कु. वेदश्री राक्षे या विद्यार्थिनींनी केले. विशेष अतिथी श्री. साहेबरावजी ठाणगे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी संवाद रूपात सादर केलेल्या पी.पी.टी. चे व अहवालाचे कौतुक केले. ही शाळा सर्वांगीण विकासावर भर देणारी आहे. शाळेचे कार्य कौतुकास्पद आहे. विद्यार्थी व शिक्षक मेहनती आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, शाळेचे नाव होईल असे काहीतरी कार्य करावे. कला, साहित्य, विज्ञान या क्षेत्रात या शाळेचे विद्यार्थी नक्कीच चमकतील अशी आशा व्यक्त केली. आपल्या सुंदर कवितेतून त्यांनी शेतकऱ्यांच्या कष्टाचे वर्णन केले. आपल्या सुमधूर आवाजात त्यांनी कविता सादर केल्या. त्याचा सर्व विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. आपल्या भावना लेखणीतून व्यक्त करायला शिका, शेतकरी, सैनिक, शिक्षक, आई-वडील यांच्याबद्दल आदर बाळगा असे सांगून विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळविल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. अतिथींच्या व मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी, सहशालेय स्पर्धा, विशेष पुरस्कार इ. पुरस्कार वितरीत करण्यात आले. ग्रीन हाऊसला सर्वोत्कृष्ट हाऊसचा चषक देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन श्रीमती कविता तेंडुलकर यांनी केले. उपस्थितांचे आभार श्रीमती नूतन गवांदे यांनी मानले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

### राष्ट्रीय मतदार दिन

दि. २२ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात आला. मतदानाचे महत्त्व या विषयावर आधारित निबंध लेखन, वक्तृत्व, रांगोळी व चित्रकला इ. स्पर्धा घेण्यात आल्या. प्रभात फेरी काढून मतदानाचे महत्त्व सांगण्यात आले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### सावित्रीबाई फुले जयंती (बालिका दिन)

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी विद्याभवन शाळेच्या सभागृहामध्ये बालिका दिन साजरा केला. मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक व शिक्षकवृंदाने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरूवात केली. कु. स्पंदन भगत, कु. अनया वऱ्हाडी, कु. हर्ष उपाध्याय या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचे बालपण व जीवनकार्य, त्यांना मुलींना शिकवत असताना समाजाकडून सहन करावा लागणारा अपमान व त्रास याबद्दल माहिती दिली. मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आज आपण सर्व मुली शिक्षण घेत आहोत हे फक्त सावित्रीबाई फुलेंमुळेच असे आपल्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती स्मिता राऊत यांनी केले व आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

### अबॅकस स्पर्धा

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षामध्ये आयडियल प्ले अबॅकस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या १८व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय अबॅकस मेंटल अँड अरिथमॅटिक स्पर्धेत विद्यार्थी कु. इलाही सय्यद, इ. ४थी यांने इएल३

या पातळीवर चौथे स्थान पटकावले तर १९व्या राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या मेंटल अँड अरिथमॅटिक ऑनलाईन स्पर्धेत इएल १ या स्तरावर द्वितीय स्थान पटकावले.

### स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती

दि. ११ जानेवारी २०२५ रोजी राजमाता जिजाऊ व विवेकानंद यांची जयंती साजरी केली. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. विद्यार्थ्यांनीही राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील काही प्रसंग, गोष्टी व त्यांचे कार्य याविषयी माहिती दिली. स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांनी जगासमोर खूप मोठा आदर्श ठेवलेला आहे. आपण त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करावा, आपल्या आई वडिलांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकाव्यात, जास्तीत जास्त पुस्तके वाचावीत, स्वामी विवेकानंद यांचे आत्मचरित्र वाचावे असे मार्गदर्शन कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती ममता राक्षे यांनी केले व आभार व्यक्त करून कार्यक्रमाचा समारोप केला.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. २० जानेवारी २०२५ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शाळेच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. पंडित तुकाराम देशमुख, सी. ई. ओ, तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, नेरुळ हे तर विशेष अतिथी म्हणून श्री. उमाकांत राऊत, सहाय्यक शिक्षक, तेरणा विद्यालय, नेरुळ हे उपस्थित होते. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, समन्वयक, शिक्षक वृंद, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते गणेश पूजन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. स्वागत गीत व प्रार्थना नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील वर्षभरातील विविध कार्यक्रमांचा अहवाल पी.पी.टी द्वारे शिक्षक श्री. संकेत थळे व श्रीमती फरहाना चौगुले यांनी सादर केला. मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक यांनी प्रमुख अतिथी व विशेष अतिथींचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, भेटवस्तू, सन्मानचिन्ह, पुस्तक व रोपटे देऊन अतिथींचा सत्कार करण्यात आला. यानंतर विशेष प्राविण्य मिळवलेले शिक्षक व सहशालेय स्पर्धेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रयत्न करत रहा, हार्ड वर्क करा, निराशा येऊ देऊ नका, अपयश आले तरी खचून जाऊ नका, प्रयत्नांची पराकाष्टा करा, यश नक्कीच मिळेल. जो व्यक्ती आपल्या गुरुजनांचा व आई-वडिलांचा आदर करेल, तो नक्कीच यशस्वी होईल असे मोलाचे मार्गदर्शन प्रमुख अतिथी प्रा. पंडित देशमुख यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शिक्षिका श्रीमती ममता राक्षे यांनी केले. या कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम् या गीताने झाला.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षक : श्रीमती श्रीजा नायर**

### विज्ञान प्रदर्शनातील सुयश

श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ न्यू बॉम्बे सीसाईड आयोजित खोज ६ विज्ञान प्रदर्शन दि. १२ जानेवारी २०२५ रोजी भारतीय विद्याभवन, वाशी येथे भरविण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थिनी कु. आर्या नाक्ती व कु. सुहानी कांबळे यांनी सीनिअर गटातून मॉडर्न प्रकृती प्रकल्पासाठी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. त्यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम रु. ६,०००/- देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रकल्पासाठी सहा. शिक्षक श्री. संदीप गुप्ता यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

**कु. आर्या नाक्ती व कु. सुहानी कांबळे यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

सोमवार दि. २० जानेवारी २०२५ रोजी विद्याभवन पूर्व-प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साही व चैतन्यपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी ज्येष्ठ साहित्यिक, कवी, निवेदक श्री. दुर्गेश सोनार, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संस्थेचे माजी विद्यार्थी, कवी व साहित्यिक श्री. सुनील देवकुळे, रा. फ. नाईक विद्यालयाचे मुख्याध्यापक कवी श्री. रविंद्र पाटील, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक श्री. मोहन पाटील, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, समन्वयक, पर्यवेक्षिका, पालक प्रतिनिधी, विद्यार्थी प्रतिनिधी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजनाने करण्यात आली. ईशस्तवनाने वातावरण मंगलमय झाले. पूर्व-प्राथमिक विभागाच्या चिमुकल्यांनी नृत्याचे सादरीकरण करून पाहुण्यांचे स्वागत केले. सहशिक्षिका श्रीमती अनुरूपा साहा व विद्यार्थिनी कु. गौरी आहेर यांनी चित्ररूपी वार्षिक अहवाल सादर केला. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, भेटवस्तू व रोपटे देऊन प्रमुख अतिथींना सन्मानित केले. प्रमुख पाहुणे श्री. दुर्गेश सोनार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना वाचनाचे महत्त्व विशद केले. आयुष्याची योग्य दिशा व मार्ग ठरवावा, जे जे सर्वोत्तम आहे त्याच्या शोधात आपण राहिले पाहिजे असे सांगितले. आकाशवाणीमध्ये काम करत असताना आलेले अनुभव त्यांनी सांगितले. 'नवा सूर्य' या कवितेचे सादरीकरण केले. इ. १० वी उत्तीर्ण प्रथम तीन विद्यार्थी, शासकीय शिष्यवृत्ती परिक्षेतील उज्ज्वल यश संपादन करणारे विद्यार्थी तसेच शालेय व आंतरशालेय स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती शीतल येनगे यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती ममता गौडा यांनी केले. वंदेमातरम्‌ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## चित्रकला स्पर्धेतील सुयश

दि. २३ जानेवारी २०२५ रोजी राजे छत्रपती शिवाजी मंडळ, तुर्भे यांच्या तर्फे शिवसेना प्रमुख सन्माननीय कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा एपीएमसी फ्रूट मार्केट, वाशी येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत माध्यमिक इंग्रजी विभागातील कु. आदित्य काळंगे (इ. ९वी) याने ८वी ते १०वी गटातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्याला प्रमाणपत्र व रोख रक्कम रु. २,१००/- देऊन गौरविण्यात आले. कु. दिव्या बाबर (इ ६ वी)हिने ५ वी ते ७वी गटातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. तिला प्रमाणपत्र व रोख रक्कम रु. १,५००/- देऊन गौरविण्यात आले. तर कु. संस्कृती पाशी (इ ८ वी ) हिने ८वी ते १०वी गटातून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तिला रोख रक्कम रु. १,१००/- व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे व मर्गदर्शक शिक्षक श्री. रमेश राऊत यांचे शाळेच्या व संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन!**

## प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन विद्याभवनच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी श्री. किसनराव गायकवाड, सेवानिवृत्त वरिष्ठ पोलिस निरीक्षक व विद्यमान दक्षता तपास अधिकारी, सिडको, विशेष अतिथी डॉ. पल्लवी अग्रवाल, नेत्ररोग तज्ज्ञ व शल्यचिकित्सक, समाजसेवक श्री. सचिन लवटे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ,

मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे, श्रीमती अस्मिता सलगर, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. श्री. किसनराव गायकवाड यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते मान्यवरांना शाल, श्रीफळ, रोपटे, पुस्तक, सन्माचिन्ह व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख अतिथींनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटी बाळगावी, आपले आचरण धर्माप्रमाणे असावे, धर्म वाचला तर राष्ट्र वाचेल, देश प्रगतीपथावर घेऊन जाण्यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे असे मत व्यक्त केले. विशेष अतिथी डॉ. पल्लवी अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा वापर कमी करावा असा मोलाचा संदेश दिला. भारत देशाचे महत्त्व विशद करून कोलंबस व वास्को द गामा भारतात कसे आले, याविषयी माहिती दिली. प्रमुख अतिथींच्या हस्ते कमलेश्वर न्यास पुरस्कृत आदर्श विद्यार्थी म्हणून सुहानी कांबळे, सिध्दांत धाडवे, विभूती गुंजाळ, प्रार्थना पाटील, आर्यन बोराडे व आदर्श शिक्षिका म्हणून श्रीमती पौर्णिमा अभिजीत कोकरे व श्रीमती राधिका अक्षय भोसले यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून विद्याभवन शाळेचे सुरक्षारक्षक वीर जवान श्री. अजय मिश्रा यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीते व नृत्यांचे सादरीकरण केले. तसेच योगासने, पिरॅमिडस् व लेझीम नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मनोज मयेकर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती मनिषा मुळे यांनी केले. वंदेमातरमने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा साठे**

**पूर्व प्राथमिक विभाग**

### मकरसंक्रांत सण उत्साहात साजरा

दि. १३ जानेवारी २०२५ रोजी मकरसंक्रांत हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी काळ्या रंगाचा पोशाख परिधान केला होता. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मकर संक्रांत या सणाचे महत्त्व समजावून सांगितले. वातावरण जसे बदलते तसेच आपल्या आहारात पण त्यानुसार बदल होत असतात. या दिवसात आपण आपले आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर गुळ, तीळ तसेच ऊस याचा आपल्या आहारात समावेश केला पाहिजे, यासंदर्भातील माहिती शिक्षकांनी सांगितली. तसेच तीळ गूळाचे महत्त्व सांगितले.

या सणानिमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध रंगांचे पतंग आणले होते. शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी पतंग उडवण्याचा आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी मांजा ऐवजी साधा दोरा वापरून पतंग उडवले. 'तीळ गूळ घ्या, गोड गोड बोला' म्हणत एकमेकांना गोड तीळ गूळ देऊन संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी विद्यार्थ्यांना संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

### प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. दीपा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगितले. या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधान अंमलात आणले. काही विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाची माहिती सांगितली. या दिवशी विद्यार्थ्यांनी केशरी, पांढरा, हिरवा आणि निळ्या रंगाचे पोशाख परिधान करून 'वंदे मातरम', 'जय जवान जय किसान', 'सारे जहाँ से अच्छा हिंदोसताँ हमारा' अशा घोषणा देत शाळेच्या आवारात फेरी मारली. ***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक
**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

**विज्ञान मेळावा**

दि. २० जानेवारी २०२५ रोजी विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा व विविध वैज्ञानिक प्रतिकृती व प्रयोग यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शाळास्तरीय विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात ६५ विद्यार्थ्यांनी आपले प्रयोग व प्रतिकृती मांडल्या. वैज्ञानिक रांगोळी प्रदर्शन देखील घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञानाधारित रांगोळ्या काढल्या. या मेळाव्याचे उद्घाटन संचालक श्री. अमोल जोशी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी आपल्या जीवनात असलेल्या विज्ञानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजून सांगितले. विज्ञान मेळाव्याला तळेगाव व खंबाळे येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते. त्यांना डिजिटल बोर्डवर वैज्ञानिक चित्रपट दाखविण्यात आला. त्यांचे पेन्सिल आणि तिळगुळ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी सर्व विज्ञान शिक्षक, विद्यालयातील शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रजासत्ताक दिन**

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी विद्यालयात ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संचालक श्री. अमोल जोशी यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी केले. यावेळी सेंट्रल गोदावरी कृषक सेवा संघ गंगापूर यांच्यावतीने इ. १०वी व १२वी या वर्गात प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन श्री. तुकाराम दाते व संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून संचालक श्री. अमोल जोशी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देतानाच विद्यालयात झालेल्या विविध विकास कामांचा आढावा घेतला. विद्यालयातील शिक्षण हे कुठल्याही इंग्रजी माध्यमांच्या शाळांपेक्षा दर्जेदार असल्याचे प्रतिपादन करून पालकांनी आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आपल्या विद्यालयातच प्रवेश घेण्याचे आवाहन केले. विविध क्रीडा स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थी खेळांडूचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. श्री. गणेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना कॉपी मुक्त परीक्षेसाठी शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. राजेंद्र जगताप यांनी केले. पुरस्कारांच्या यादीचे वाचन श्री. चेतन गोऱ्हे यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. प्रशांत सूर्यवंशी यांनी मानले. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांची सदिच्छा भेट**

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि जी. के. पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे येथील प्राध्यापकांनी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमावेळी विद्यालयाला सदिच्छा भेट दिली. विभाग प्रमुख डॉ. श्री प्रसन्न शेटे, प्रा. श्री. महेश पोतदार, प्रा. आनंद नजन, प्रा. रविंद्र पाटील, प्रा. निलेश कुचेकर, प्रा. राजेश राठोड, प्रा. बाळासाहेब मोकर यांचे स्वागत संचालक श्री. अमोल जोशी यांनी केले. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत त्यांचे कौतुक केले. शिक्षकांशी संवाद साधताना त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत राबविण्यात विविध

उपक्रमांची माहिती दिली. संचालक श्री. अमोल जोशी यांनी तळेगाव शाखेची सविस्तर माहिती अतिथी प्राध्यापकाना दिली. विद्यालयातील शिक्षकांनीही आपआपली मते मांडली. सर्वांना तिळगूळ देण्यात आला. श्री. चेतन गोऱ्हे यांनी आभार मानले.

**स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ**

दि. २८ जानेवारी २०२५ रोजी विद्यालयात स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक श्री. अमोल जोशी उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कै. दादासाहेब केतकर व कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची विधिवत सुरूवात झाली. आपल्या स्वागत पर प्रास्ताविकात मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी शैक्षणिक वर्षात विद्यालयाने केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. कु. ज्ञानेश्वरी पगार हिने वार्षिक अहवाल वाचन केले. पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी यांनी क्रीडा अहवाल वाचन केले. राष्ट्रीय व राज्यस्तरावर क्रीडा स्पर्धेत यश मिळवणाऱ्या खेळाडूंचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी व श्री. संजय गीते यांचा सत्कार करण्यात आला शालाबाह्य निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. अर्चना गीत, दैनिक लोकमत व उडान फौंडेशन आयोजित उपक्रमात सहभागी होऊन पुरस्कार मिळविणाऱ्या श्री. प्रशांत सूर्यवंशी यांचाही सत्कार केला. उपक्रमशील कर्मचारी पुरस्कार सेवक श्री. नामदेव किसान घुलूम यांना प्रदान करण्यात आला. माजी विद्यार्थी मंडळ मुंबई यांच्या देणगीतून गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध बौद्धिक स्पर्धा, क्रीडा, स्पर्धा परीक्षा, देणगी व्याज विनियोग उपक्रमातर्गत पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचाही सत्कार संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. कु. हर्षदा सदगीर या विद्यर्थिनीने लिहिलेल्या लेखसंग्रहाचे प्रकाशन संचालक श्री. अमोल जोशी यांनी केले. अध्यक्षीय मनोगतात संचालक श्री. अमोल जोशी यांनी तळेगाव शाखेच्या व विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करतानाच तळेगाव शाखेच्या विकासासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे सांगितले. तसेच विद्यालयातील सर्व वर्ग आता डिजिटल क्लासरुम झाले असून पालकांनी ते आवर्जून पहावेत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रतिभा ठाकूर व सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. देणगी व्याज विनियोग पुरस्काराचे वाचन श्री. चेतन गोऱ्हे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी मानले. यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गीत व नृत्य अविष्कारांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. यावेळी पालक, आजी माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**स्नेहभोजन कार्यक्रम**

दि. २९ जानेवारी २०२५ रोजी संस्थेतर्फे विद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.

**शैक्षणिक सहल**

दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल इमॅजिका पार्क येथे नेण्यात आली. या सहलीत ५१ विद्यार्थी व ६ शिक्षकांनी सहभाग घेतला.

**आशिर्वाद समारंभ**

दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयात इ. १२वी व १०वी च्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी इ. १२ वी व इ.

१०वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रति ऋण व्यक्त केले. बारावीच्या आशिर्वाद समारंभात संगिता ढोन्नर, गौरी कडलग या विद्यार्थीनिनी आपले मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**अभिनंदनीय**

दि. १९ जानेवारी २०२४ रोजी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने कुलगुरू कै. दादासाहेब केतकर यांच्या स्मृति प्रित्यर्थ दिला जाणारा राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५' यावर्षी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संजय मदन जोशी यांना संस्थेच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष व अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे यांच्या शुभ हस्ते प्रदान करण्यात आला. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांचे संचालक श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले. दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ नासिक रोड आणि लायन्स क्लब ऑफ नासिक कर्मवीर यांच्यातर्फे आयोजित अंतर शालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धेत आपल्या विद्यालयातील कु. ओमकार गोपाळ पगार व कु. सोहम नंदू दाते इ.८ वी या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. या विद्यार्थ्यांनी वाहतुकीतून ऊर्जा निर्मिती हा प्रोजेक्ट सादर केला होता. या स्पर्धेत 'प्रोजेक्ट नॅरेटर' या कॅटेगिरी मध्ये तिसरा क्रमांक मिळवला. या प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक श्री. लक्ष्मण चव्हाण, सौ. स्वाती भावसार व श्री. विवेक गावित यांनी मार्गदर्शन केले.

**कु. ओमकार पगार व कु. सोहम दाते यांचे व त्यांच्या मार्गदर्शन शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

**खाऊच्या पैशातून पुस्तकांची भेट**

दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयातील इ. ७ वी ब च्या विद्यार्थ्यांनी खाऊच्या पैशातून एकूण रु. ९५५/- ची ६२ पुस्तके ग्रंथालयास भेट दिली. त्यांना वर्गशिक्षिका श्रीमती रक्षा शिवदे यांनी मार्गदर्शन केले.

***

*** विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव (अं), नाशिक ***



वार्षिक पारितोषिक समारंभात राज्यस्तरीय लंगडी स्पर्धेत प्रतिनिधित्व करणाऱ्या मुलींच्या लंगडी संघाच्या सत्कार प्रसंगी संचालक श्री. अमोल जोशी, समवेत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे,
पर्यवेक्षक व ज्येष्ठ क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते, शिक्षक प्रतिनिधी श्री. सुकदेव निंबेकर

## ❋ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव (अं), नाशिक ❋



दि. २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताकदिनी राष्ट्रध्वजास सलामी देताना संचालक श्री. अमोल जोशी, समवेत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी, शिक्षक व विद्यार्थी



वार्षिक स्मेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी कु. हर्षदा सदगीर हिने लिहिलेल्या लेख संग्रहाचे प्रकाशन करताना संचालक श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी व ग्रंथपाल सौ. अर्चना गीत




पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळातर्फे देण्यात येणारा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे यांच्या शुभहस्ते स्वीकारताना पर्यवेक्षक श्री. संजय जोशी, समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



खाऊच्या पैशातून ग्रंथालयास पुस्तके भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना प्राचार्य श्री. शरद कोठावदे आणि वर्गशिक्षिका श्रीमती रक्षा शिवदे

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ-नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

### बालिका दिन

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती म्हणजेच बालिका दिन साजरा करण्यात आला. यानिमत्त सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. सोनाली शिंपी यांनी सावित्रीबाईंच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### पक्षी दिन

दि. ५ जानेवारी २०२५ रोजी पक्षीदिन साजरा करण्यात येतो. शिक्षक श्री. केशव देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना पक्षीदिन साजरा करण्याचे महत्त्व सांगितले. तसेच आपण पशुपक्ष्यांचे संवर्धन व जतन केले पाहिजे हे आवर्जून नमूद केले.

### रायझिंग डे

दि. ४ जानेवारी रोजी महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना झाली. महाराष्ट्र पोलीस दलाकडून स्थापना सप्ताहान्तर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पोलीस कार्यालयात आमंत्रित करण्यात आले होते. इ. ५वीच्या विद्यार्थ्यांना म्हसरूळ पोलीस कार्यालयात नेण्यात आले. पोलीस कार्यालयातील पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना गुन्ह्यासंबंधित विविध माहिती सांगितली. विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली. पोलिसांची मदत आपण संकटात कशी घेऊ शकतो हे सांगितले. पोलिसांच्या विविध पथकांची माहिती दिली. पोलीस हत्यारांची माहिती दिली.

### नायलॉन मांजा न वापरण्याची शपथ

दि. ६ जानेवारी २०२५ रोजी इ. १ली ते इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी पतंग उडविताना नायलॉन मांजाचा वापर करणार नाही, साधा मांजा वापरून पतंग उडवून संक्रांत सण साजरा करू तसेच पर्यावरणरक्षक बनू अशी शपथ घेतली.

### अभिनंदनीय

* सप्टेंबर २०२४ मध्ये कलाविकास संस्थेतर्फे रंगबहार राज्यस्तरीय चित्रकला आणि हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ३२९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. चित्रकला स्पर्धेत आठ विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले. हस्ताक्षर स्पर्धेत पाच विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले. विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे

| स्पर्धा | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| चित्रकला | कु शरण्या सुजित जोशी | १ली |
| | कु. कनिष्का वैद्य | १ली |
| | कु. श्रेया किशोर बाविस्कर | ३री |
| | कु. स्फूर्ती दर्शन बोरसे | ३री |
| | कु. श्रेया बबन घडवजे | ४थी |
| | कु. तनुश्री विवेकानंद गिरी | ५वी |
| | कु. स्पंदना म्हसदे | ६वी |
| हस्ताक्षर | कु. अंतरा कमलेश म्हसकर | १ली |
| | कु. त्रिशा रितेश नेहते | २री |
| | कु. त्रिशा सचिन जाधव | ३री |
| | कु. श्रावणी विजय चव्हाण | ४थी |
| | कु. परम रमेश कदम | ५वी |

* ॲबॅकस राष्ट्रीय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. पूर्वा संदीप पगर | ५वी |
| कु. आर्या अतुल वाघ | ३री |
| कु. खुशी दत्तात्रय मंडलिक | ५वी |
| कु. आरोही अतुल वाघ | ३री |

### सावित्रीबाई फुले जयंती व जिजामाता जयंती

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला

पुष्पहार घालून पूजन केले.

दि. १३ जानेवारी २०२५ रोजी राजमाता जिजाबाई यांची जयंती साजरी करण्यात आली. जिजामातेने शिवरायांना कसे घडवले व स्वराज्य स्थापनेची प्रेरणा त्यांच्यामध्ये निर्माण केली. या विषयी सौ. निर्मला अरसुले यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

दि. २१ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. हा दिवस युवकदिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षिका सौ. योगिता कोठावदे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### एलिमेंटरी चित्रकला परीक्षा

इ. ७वीच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे चित्रकलेची एलिमेंटरी ही परीक्षा सप्टेंबर महिन्यात घेण्यात आली होती. या परीक्षेस ५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १५ विद्यार्थी ब श्रेणीत उत्तीर्ण झाले.

### मकरसंक्रांत व भूगोलदिन

दि. १४ जानेवारी २०२५ रोजी भूगोलदिन साजरा करण्यात येतो. भूगोलदिनाविषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. तसेच दि. १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांत साजरी करण्यात येते. या विषयी पारंपरिक व भौगोलिक माहिती कु. पूजा गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि. २३ जानेवारी २०२५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करण्यात आली. नेताजींच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. निशिगंधा सोमवंशी यांनी विद्यार्थ्यांना नेताजींच्या स्वातंत्र्य चळवळीची माहिती सांगितली.

### देशभक्तीपर गीत गायनात विद्यार्थ्यांचा सहभाग

दि. २५ जानेवारी २०२५ रोजी फाऊंडेशन सांस्कृतिक कला मंडळातर्फे देशभक्तीपर समूहगान आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमात ८१ शाळेच्या ३१००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात करण्यात आला. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सर्व शाखांचे प्राचार्य व प्रमुख या कार्यक्रमास उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी ध्वजाला सलामी देत राष्ट्रगीत, झेंडागीत गायले. इ. ८वी व इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी परेड करत राष्ट्रध्वजाला सलामी दिली. प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थिनी कु. आरुषी संकोपाल इ. ३री आणि कु. मानस अहिरे इ. ५वी यांनी भाषण केले. तसेच पूर्व प्राथमिक विभागाची विद्यार्थिनी कु. प्रथा हजारे हिने प्रजासत्ताकदिनाची माहिती सांगितली. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी कु. अर्णव माटेगावकर व विद्यार्थिनी कु. मनिषा जाधव, कु. मृण्मयी बागुल यांनी देशभक्तीपर गीत गायले. कु. ज्योत्स्ना गायकवाड व कु. दामिनी पवार यांनी नृत्य सादर केले. इ. ६वी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले, माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पिरामिड सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली देवरे व श्री. सौरभ गायकवाड यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. सतिश शिंपी यांनी केले. या कार्यक्रमास अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, वाणिज्य, विज्ञान व कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे तसेच सर्व शाखांचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

दि. २५ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त इ. ५वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व बॅच बनवणे स्पर्धा आणि इ. ६वी व ७वी च्या विद्यार्थ्यांची निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

### लाला लजपतराय जयंती

दि. २८ जानेवारी २०२५ रोजी लाला लजपतराय जयंती साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. प्रमिला उदर यांनी त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.

## हुतात्मा दिन

दि. ३० जानेवारी २०२५ रोजी हुतात्मा दिनानिमित्त देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना दोन मिनिट डोळे बंद करून श्रद्धांजली देण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती शिक्षिका सौ. शुभांगी देशमुख यांनी सांगितली.

## कौतुकास्पद वार्ता

इ. १ली ते इ. ७वी च्या विद्यार्थ्यांची इंग्लिश मॅरेथॉन परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल जानेवारी २०२५ मध्ये जाहीर झाला. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले. या परीक्षेला २५९ विद्यार्थी बसले होते. त्यातील आठ विद्यार्थी प्रथम क्रमांकाने, नऊ विद्यार्थी द्वितीय क्रमांकाने तर आठ विद्यार्थी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. तसेच २१८ विद्यार्थ्यांनी पदक संपादन केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| पहिली | कु. परदेशी शिवन्या रितेश | प्रथम |
| | कु. सृष्टी संदीप शिसोदे | द्वितीय |
| | कु. अनिश गणेश कुलकर्णी | तृतीय |
| दुसरी | कु. ईश्वरी वासुदेव खोडे | प्रथम |
| | कु. मनस्वी मनोज येवले | प्रथम |
| | कु. स्वयंम स्वप्नील जाधव | द्वितीय |
| | कु. श्रीराम निकम | द्वितीय |
| | कु. स्वरूप अनिल भामरे | तृतीय |
| तिसरी | कु. ग्रीष्मा गणेश थेटे | प्रथम |
| | कु. दुर्वेश देविदास बागुल | द्वितीय |
| | कु. जय तुषार बाफना | तृतीय |
| चौथी | कु. श्रावणी विजय चव्हाण | प्रथम |
| | कु. देवांश योगेश शेटे | द्वितीय |
| | कु. राधिका सचिन खैरनार | तृतीय |
| | कु. तोशिका तुषार कुशारे | तृतीय |
| पाचवी | कु. रियांश गणेश पवार | प्रथम |
| | कु. निर्मल संतोष जगताप | द्वितीय |
| | कु. रुही सुरेशभाई | तृतीय |
| सहावी | कु. सक्षम विष्णू महाले | प्रथम |
| | कु. लोकेश बबन सोनवणे | द्वितीय |
| | कु. आदित्य राकेश टारगे | द्वितीय |
| | कु. रुद्र दत्तात्रय सोनवणे | तृतीय |
| सातवी | कु. अर्णव गौतम माहुरे | प्रथम |
| | कु. आशुतोष सत्यशील दुबल | द्वितीय |
| | कु. हर्षल रमेश धवील | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## शैक्षणिक सहल

दि. १० जानेवारी २०२५ रोजी इ. १ली व इ. २रीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल सिन्नर येथील अशोका मोहदरी फार्म या ठिकाणी नेण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी विविध साहसी खेळ खेळले. साहसी खेळांतर्गत शारीरिक व्यायामाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

दि. २१ जानेवारी २०२५ रोजी इ. ३री ते इ. ५वी च्या विद्यार्थ्यांची सहल शिर्डी येथील 'साईतीर्थ पार्क' आणि 'वेट ॲण्ड जॉय' येथे नेण्यात आली होती. साईतीर्थ पार्क येथे विद्यार्थ्यांना एस. डी. फिल्म दाखविण्यात आली. त्यात भारतातील धार्मिक स्थळांच्या प्रतिकृती करण्यात आलेल्या आहेत. त्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी 'वेट जॉय' मध्ये विविध राइड्सचा आनंद लुटला.

## भूगोल प्रदर्शन

दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी इ. ६वी व इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी विविध भौगोलिक प्रतिकृती बनविल्या. या प्रतिकृती मांडून त्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. ***

## * डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक *



दि. ४ जानेवारी २०२५ रोजी म्हसरूळ पोलीस कार्यालयास भेट प्रसंगी उपस्थित पोलीस अधिकारी, शिक्षक आणि इ. ५वीचे विद्यार्थी



कलाविकास संस्थेतर्फे रंगबहार या राज्यस्तरीय चित्रकला आणि हस्ताक्षर स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक शिक्षिका



दि. ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी उपस्थित विद्यार्थिनी



दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताकदिनी राष्ट्रध्वजास सलामी देताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, समवेत प्राचार्य, आणि मुख्याध्यापिका

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

**माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभाग**

### शिक्षण आणि आनंदाचा संगम

इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर सहल एक प्रेरणादायी आणि संस्मरणीय शैक्षणिक अनुभव म्हणून कायम मुलांच्या लक्षात राहील. या सहलीतील प्रवासाची सुरूवात गोंदे येथील पार्ले जी या कारखान्याच्या भेटीने झाली. विद्यार्थ्यांनी बिस्किट उत्पादन प्रक्रियेचे तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन कौशल्ये, आणि उत्पादनाशी संबंधित प्रत्येक टप्प्याचे सूक्ष्म निरीक्षण केले. प्रत्यक्ष अनुभवाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला व्यवहारी दृष्टिकोन प्राप्त करून दिला. यानंतर सहल इगतपुरी येथील शांत निसर्गरम्य वैतरणा धरणाजवळच्या 'द मिराज लगून रिसॉर्ट'कडे मार्गक्रमीत झाली. विद्यार्थ्यांनी निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेत रोमांचक साहसी राइडसचाही आनंद घेतला. यासोबतच विशेष खाद्य पदार्थांचा आस्वाद घेत सहलीचा आनंद लुटला. ही सहल शिक्षण, निसर्ग, आणि आनंदाचा संगम ठरली. यामुळे विद्यार्थ्यांसाठी हा दिवस अविस्मरणीय ठरला.

### शासकीय रेखा कला ग्रेड परीक्षा निकाल

२०२४-२५ मध्ये झालेल्या एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेचे निकाल जाहीर झाले असून या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे.

एलिमेंटरी साठी ३९ तर इंटरमिजिएट साठी ७० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी एलिमेंटरीमध्ये ३७ तर इंटरमिजिएट मध्ये ६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एलिमेंटरी मध्ये दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, तर १५ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच इंटरमिजिएट मध्ये दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २१ विद्यार्थी द्वितीय श्रेणी, तर ४६ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना चित्रकला विषय शिक्षिका सौ. रूपाली दंडगव्हाळ यांनी मार्गदर्शन केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### पथनाट्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग

दि. ११ व १२ जानेवारी २०२५ रोजी न्यू त्रिमूर्ती गार्डन लॉन्स, औरंगाबाद रोड येथे राष्ट्र सेवा दलाने साने गुरूजींच्या १२५ व्या जयंतीनिमित्त राज्य तारे कुमार-युवा संमेलन आयोजित केले होते. यामध्ये पथनाट्य स्पर्धा घेण्यात आली. या संमेलनातील पथनाट्यांचा विषय 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' असा होता. या पथनाट्यासाठी डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलमधील माध्यमिक विभागातील इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

पथनाट्याच्या स्पर्धेत एकूण २० गट सहभागी झाले होते. ठरवून दिलेल्या प्रत्येक ठिकाणी दोन गट नेमण्यात आले. डॉ. काकासाहेब देवधर शाळेतील विद्यार्थ्यांनी आडगाव नाका येथे सादरीकरण केले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

### आदर्श शिक्षक पुरस्कार

दि. १९ जानेवारी २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ हीरक महोत्सवी सांगता समारंभ प्रसंगी 'आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा' आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये वरिष्ठ शिक्षिका सौ. सोनिया किशोर राजवाडे यांना 'आदर्श शिक्षिका' पुरस्कार कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि

अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

**बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन**

इ. १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना यशाचा मूलमंत्र दिला. तसेच परीक्षेच्या काळात शारीरिक व मानसिक आरोग्य कसे जपावे याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. आपल्या मनोगतामध्ये त्यांनी शिक्षक आणि शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत शाळेच्या वतीने उपयुक्त भेटवस्तू देण्यात आल्या. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या मनात कायम स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा**

दि. २६ जानेवारी २०२५ या दिवशी ७६वा प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व झेंडा गीत सादर केले. संचलन करत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय ध्वजाला सलामी दिली. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने एकत्रितपणे भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले. सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी भाषणातून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी देशभक्तीपर गीते, नृत्ये आणि मानवी मनोऱ्यांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

याप्रसंगी सर्व विभागातील प्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. वैशाली देवरे यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. सतीश शिंपी यांनी केले. ✻✻✻

**✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक ✻**



दि. १९ जानेवारी २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ हीरक महोत्सवी सांगता समारंभामध्ये कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे यांच्या हस्ते 'आदर्श शिक्षिका' पुरस्कार स्वीकारताना वरिष्ठ शिक्षिका सौ. सोनिया किशोर राजवाडे

## श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

### धामणकर महाविद्यालयात स्कूल कनेक्ट २.० कार्यक्रमाचे आयोजन

महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी होण्यासाठी उच्च शिक्षण व्यवस्थेचे झालेले नूतनीकरण आणि आमूलाग्र बदल सकारात्मक दृष्टीने दहावी, बारावीचे विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी स्कूल कनेक्ट २.० या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी श्री. सुनील जोशी यांनी कोणते शिक्षण घ्यावे यापेक्षा कसे घ्यावे, पालकांनी आपल्या पाल्याशी कसा संवाद साधावा आपल्या पाल्याची टीका व अवास्तव स्तुती टाळण्याचे आवाहन केले. पाल्याच्या भविष्याचा विचार करताना त्याची आवड, निवड त्याची विचार करण्याची पध्दत या सर्वांचा सर्वांगीण विचार करावा. आपल्या पाल्यामध्ये चिकाटी, धैर्य व संयम रूजविण्यासाठी प्रयत्न करावे. पाल्याच्या करिअरचा विचार करताना शिक्षणाची एकूण वर्षे, कौटुंबिक, शैक्षणिक, व्यावसायिक परंपरा तसेच कुटुंबातील शैक्षणिक धोरण या बाबींचा विचार करावा. असे प्रतिपादन केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण घेणे व सोडणे सोपे होणार तसेच, कल्पक व लवचिक अभ्यासक्रमाची रचना या धोरणात असणार आहे. विद्यार्थी कशाप्रकारे बहुशाखीय शिक्षण घेऊ शकतो हे सांगितले.

नवीन शैक्षणिक धोरणात पालकांची भूमिका महत्त्वाची आहे. या अनुषंगाने पालकांनी वेळोवेळी महाविद्यालय, प्राध्यापक व तज्ज्ञांशी संवाद साधावा. वाचन संकल्प महाराष्ट्राचा व स्कूल कनेक्ट २.० या दोन्हींचा समन्वय साधून महाविद्यालय व ज्योती स्टोअर्सचे संचालक श्री. वसंत खैरनार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. संगणक शास्त्र विभागाच्या शुभदा सिंगदकर यांनी रांगोळीद्वारे विद्यार्थी व पालकांना मोबाईलच्या आहारी गेलेल्या पाल्याचे चित्र रेखाटून विद्यार्थी व पालकांचे लक्ष वेधून घेतले व त्यांना जागृत राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व प्राध्यापक विद्यार्थी यांनी प्रयत्न केले. ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल कविता मुर्तडक व सारिका जगताप यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी केले. संगणक शास्त्र विभागाच्या योगिता काकड यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांचा परिचय कला विभागाच्या हेमांगिनी पाटील यांनी करून दिला. आभार प्रदर्शन वाणिज्य विभागाच्या श्वेता चोपडेकर यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी काकासाहेब देवधर स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे, सौ. प्रतिमा वैद्य व श्रीमती भारती पाटील तसेच बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

### वेबसाईट डिझायनिंग कार्यशाळा

दि. १७ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयत रिॲक्ट प्रणाली कार्यशाळा संपन्न झाली. रिॲक्ट प्रणालीचे निर्माते तज्ज्ञ श्री. राहुल जाधव यांनी संगणक शास्त्राच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रिॲक्ट प्रणालीचा वापर करून वेबसाईट कशी बनवायची याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले. या कार्यशाळेत सर्व विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक करून वेबसाईट बनवल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे होते. सध्याच्या काळात नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यानी मार्केटचा सर्वे करून काळानुरूप जिथे एक प्रणालीची आवश्यकता आहे,

तिथे अनेक प्रणाली आत्मसात करून आपले ध्येय साध्य करावे असे मनोगत प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. श्याम सोनावणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन निलेश घायाळ यांनी केले व आभार नित्यानंद विश्वकर्मा याने मानले. कार्यक्रमाप्रसंगी संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. जयमाला सातपुते, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन**

दि. १८ जानेवारी २०२५ रोजी वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्राध्यापक गणेश रोडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षांचे अभ्यासक्रम, या परीक्षांच्या अभ्यासाठी रणनीती मार्गदर्शन करून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना येणाऱ्या विविध अडचणी व त्यावरील उपाययोजनांवर चर्चा केली व अभ्यासात जिद्द, चिकाटी, मेहनत व सातत्य यांच्यासोबत आधुनिक ज्ञानसाधनांचे महत्त्व असल्यास यश नक्कीच मिळेल असे प्राध्यापक गणेश रोडे यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना स्पर्धापरीक्षेचे महत्त्व सांगितले.

**सुशासन व माझी भूमिका**

दि. २३ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालय व रोटरी क्लब अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने सुशासन व माझी भूमिका या विषयावर आयोजित कार्यक्रमात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय भारत सरकार राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. प्रदीप पेशकर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. सुशासन म्हणजे लोकशाही मधील पारदर्शकता होय. सुशासन म्हणजे जबाबदारी, लोक सहभागाबरोबर कायद्याचे राज्य, शासकीय धोरण व योजनांचे विश्लेषण करणे, त्रुटी ओळखणे आणि उपाय सुचवणे यात विद्यार्थाची तसेच समाजातील भूमिका महत्त्वाची ठरत असते. तसेच भारत हा नेहमी शांततेची भूमिका घेत असतो. भारताची लोकसंख्या जरी जास्त असली तरी त्याचा जगाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असतो, आज नवनवीन संशोधन वा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारताचे महत्त्व जगाला दाखवून देत आहे, ह्यात भारतातील सुशासन महत्त्वाची भूमिका घेत आहे असे प्रतिपादन सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग मंत्रालय भारत सरकार राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. प्रदीप पेशकर यांनी केले.

भारताच्या राजकारणात २००४ नंतर कसे बदल होत गेले त्याचा सामाजिक व राजकीय जीवनावर कसा परिमाण होत गेला, सरकार चालवायला नुसता नेता किंवा लोकप्रतिनिधींचा सहभाग असून चालत नाही तर लोकांचा प्रत्यक्ष सहभाग पण लागतो. देशाच्या विकासासाठी सुशासन जसे काम करत आहे त्याला समाजातील तरुणांची साथ मिळाल्यास चांगली गती मिळू शकते. भारताची लोकशाही सुशासन या प्रणाली मुळे इथून पुढे ओळखली जाणार. या साठी मा. श्री. नरेंद्र मोदी यांची चित्रफित दाखविण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक, प्रकल्प समन्वयक श्री. राजेश पुसदकर यांनी केले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी अशा कार्यशाळा राबविल्या पाहिजे त्यासाठी संस्था व महाविद्यालय नक्कीच मदत करेल तसेच सुशासन व शासकीय योजना राबविण्यासाठी नागरिक म्हणून सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे म्हणजे स्वतः बरोबर देशाचासुद्धा विकास होईल असे अध्यक्षीय मनोगतात सांगितले. डेल्टा फिनोकेमचे संस्थापक दादासाहेब देशमुख यांनी कार्यक्रमाचा उद्देश तसेच

नागरिक म्हणून आपण या कार्यक्रमास चांगल्या भावनेने पाठिंबा दिला पाहिजे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास रोटरी क्लब अंबड च्या अध्यक्ष नीता लेले, श्री. चारुदत्त रायते, सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी मान्यवरांचे स्वागत व सत्कार केला. कार्यक्रमाचे आयोजन संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. जयमाला सातपुते यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. श्वेता चोपडेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. संदीपकुमार पंडित यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**ई-सेल स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश**

दि. १ ते ३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आय. आय. टी., मुंबई यांचेतर्फे आयोजित 'ई सेल' स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. तीन दिवस चाललेल्या आणि देशभरातील चार हजारांपेक्षा अधिक स्पर्धकांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत धामणकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. ई सेल उपक्रमांचे मेंटोर महाविद्यालयातील संगणक विभागातील श्री. संदीप कुमार पंडित होते. विद्यार्थी कु. भूषण ठाकूर, कु. मनीषा जाधव, कु. नूपुर सातकर, कु. राज महाजन, कु. मयूर लगदीर, कु. प्रथमेश ठाकरे या विद्यार्थ्यांनी टास्कचे नेतृत्व केले. कु. भूषण ठाकूर याने संघ प्रमुख म्हणून काम केले. तीन दिवस चाललेल्या स्पर्धेत क्विज, ग्रुप डिस्कशन, लीगल बूट कॅप आदी स्पर्धा घेण्यात आल्या. ई- सेल उपक्रमातू विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राबाबत माहिती देण्यात आली. उद्योगाच्या विविध पैलूवर चर्चा करण्यात आली. यावेळी उद्योग क्षेत्रातील टाटा कंपनीचे शंतनू नायडू, शार्क आणि शार्क कंपनीचे श्री. अनुपम मित्तल, श्री. विराज बहल, इन्फोसिस कंपनीचे श्री. नंदन निलकेणी आदींनी सखोल मार्गदर्शन केले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि कार्यवाह श्री. संजय गुंजाळ तसेच प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. **सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव ई सेलच्या श्रीमती सुलताना यांच्या हस्ते करण्यात आला.**

**मानसिक आरोग्यावर व्याख्यानाचे आयोजन**

आपणा सर्वांच्या मानसिक आरोग्याच्या समस्या सोडविण्यासाठी व्यायाम, योग, ध्यानधारणा, पुरेशी झोप, दीर्घश्वसन, प्राणायाम आणि समुपदेशन यांची गरज असते असे प्रतिपादन अनंत चिकित्सालयाच्या मानसोपचार तज्ज्ञ सुप्रिया पाटील यांनी केले.

**किशोरवयीन मुलींचे मानसिक आरोग्य यावर व्याख्यानाचे आयोजन**

महिला तक्रार कक्ष अंतर्गत किशोरवयीन मुलींचे मानसिक आरोग्य याविषयावर अनंत चिकित्सालयच्या मानसोपचार तज्ज्ञ सुप्रिया पाटील यांचे व्याख्यान सोमवार दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाले. किशोरवयीन मुलींमध्ये होणारे हार्मोनल बदल मानसिक, वैचारिक आणि सामाजिक बद्दल यावर मार्गदर्शन केले. मुलींनी आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. मानसिक आरोग्य जपण्यासाठी नेहमी सकारात्मक विचार मनात आणले पाहिजे. मुलींनी आपले स्वतःचे अस्तित्व जपले पाहिजे. मानसिक, शारीरिक इत्यादी आजारावर मात करण्यासाठी आपले छंद जोपासले पाहिजे, नवीन भाषा शिकली पाहिजे. असेही पाटील यांनी सांगितले. या कार्यक्रमप्रसंगी प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य विभागाच्या प्रमुख प्रतिभा रायते यांनी केले. सूत्रसंचालन संगणकशास्त्र विभागाच्या प्रणाली होळकर तर परिचय वाणिज्य विभागाच्या श्वेता चोपडेकर यांनी करून दिला. आभार कला विभागाच्या मंगला कांदळकर यांनी मानले. कार्यक्रम प्रसंगी सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

***

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**संचालक : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

## सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव तसेच सर्व विभाग प्रमुख प्रा. डॉ. अमोल रासने, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्राध्यापक वृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थीनी कु. ऋतुजा पवार हिने केले. कार्यक्रमाविषयी माहिती प्रा. शिवाली माळी व विशाखा राजपुरे यांनी दिली. सावित्रीबाई ज्योतिराव फुले या एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासोबत भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. त्यांनी १ जानेवारी, १८४८ रोजी पुणे येथील भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. अशा महान व्यक्तीने गोरगरीब वर्गाच्या सुधारणेसाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी महान कार्य केले. आपण सर्वांनी त्यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करून त्यांचे कार्य पुढे नेले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे समन्वयक सहाय्यक ग्रंथपाल निवृत्ती डावखर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शीतल बाराहाते यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दीपाली रायते यांनी प्रयत्न केले.

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम संपन्न

दि. १२ जानेवारी २०२५ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने, डॉ. शिवाजी गवळी, डॉ. योगिता अहिरे, प्रा. सतीश भदाणे, प्रा. इंद्रजीत सोनवणे, ग्रंथपाल प्रा. संदीप दराडे, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे समन्वय प्रा. शिवाली माळी यांनी केले. सूत्रसंचालन कु. प्रथमेश पाडवी याने केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी प्रा. सुहास धारणे यांनी आपल्या प्रास्ताविकेत बोलताना जिजाऊ यांनी शिवाजी महाराजांसारखा पुत्र तयार करून राष्ट्र भक्ती आणि समाज जागृती करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. स्वामी विवेकानंद यांनी तंत्रज्ञानाची गरज असल्याचे सांगितले. युवकानी त्यांचा आदर्श समोर ठेऊन भारताच्या प्रगती कडे लक्ष देण्याची गरज आहे.

कु. मोक्षदा पगार हिने राजमाता जिजाऊंबद्दल सांगताना, लहानपणापासूनच जिजाऊंना अन्यायाविरुद्ध चीड होती. या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी खेळण्याच्या वयात हाती तलवार आणि ढाल घेत युद्धकौशल्य अंगीकृत केले. शिवबांना अगदी लहानपणापासून रामायण आणि महाभारतातील शौर्य कथा त्यांनी सांगितल्या. कु. पार्थ सावळे याने स्वामी

विवेकानंद यांच्यविषयी माहिती देताना त्यांनी आपल्या विचारांमुळे स्वत:ची एक वेगळी ओळख बनवली. भारत तरुणांचा देश असून या तरुणांना स्वामी विवेकानंद यांचे विचार योग्य दिशा देतील. ते अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. भारत सरकारने स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय युवा दिवस म्हणून जाहीर केला.

कार्यक्रमाच्या शेवटी कु. प्रणाली परदेशी हिने सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमासाठी कु. दिपाली रायते यांचे सहकार्य लाभले.

### महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिराचे उद्‌घाटन

दि. १७ ते २३ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन महादेवपूर ता. जि. नाशिक येथे झाले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

महादेवपूर येथील सरपंच सौ. अंबिका ज्ञानेश्वर पाटीदे, उपसरपंच केशव मधुकर शिंदे ग्रामसेवक रंगनाथ संतोष मोरे, प्रकाश बाजीराव भागवत (लिपिक) ग्रामपंचायत सदस्य जि. प. शाळा मुख्याध्यापिका सौ. सीमा पाटील या सर्वांनी विद्यार्थांना गावाची माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी गवळी (कार्यक्रम अधिकारी ) यांनी ग्रामस्थांना पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या विविध शाखांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच सात दिवसात कोणकोणते उपक्रम राबविणार आहे याची माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील समन्वयक प्रा. सुहास धारणे (विद्यार्थी विकास अधिकारी), प्रा. पंकज वाडीले वेगवेगळ्या विभागाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महात्मा गांधी स्मृतिदिन संपन्न

दि. ३० जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी स्मृतिदिनानिमित्त महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, सर्व विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी गवळी, प्रा. डॉ. अमोल रासने, प्रा. डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्लेसमेंट अधिकारी प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा.डॉ.संदीप दिवे, प्रा.डॉ.योगिता आहिरे, ग्रंथपाल श्री.संदीप दराडे, प्राध्यापक वृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थीनी कु. संजीवनी खैरनार हिने केले. महात्मा गांधी यांच्या कार्याविषयी माहिती विद्यार्थिनी कु. पल्लवी सोळंके हिने दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती पिंगळे व सहाय्यक ग्रंथपाल निवृत्ती डावखर यांनी केले. आभार प्रदर्शन कु. भाग्यश्री परदेशी हिने केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दीपाली रायते, सृष्टी बोरस्ते व धनंजय आहिरे यांनी प्रयत्न केले.

### वसुंधरा चित्रपट महोत्सवात श्री. आनंद शिंदे व डॉ. राजेंद्र खैरे यांचा सन्मान

महाविद्यालयात 'किर्लोस्कर' वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उत्साहात उद्‌घाटन करण्यात आले. यानिमित्त रसिकांना दिवसभर निरनिराळ्या लघुपटांची पर्वणी लाभली. हत्तीची भाषा अवगत असणारे श्री. आनंद शिंदे व श्री गुरुजी रुग्णालयाचे

संचालक डॉ. राजेंद्र खैरे यांना 'वसुंधरा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष श्री. आर. आर. देशपांडे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी 'ट्रन्क कॉल : द वाइल्डलाईफ' फाउंडेशनचे संस्थापक श्री. आनंद शिंदे यांना 'किर्लोस्कर वसुंधरा सन्मान' आणि श्री गुरुजी रुग्णालयाचे संचालक डॉ. राजेंद्र खैरे यांना 'किर्लोस्कर वसुंधरा मित्र' पुरस्कार श्री. आर. आर. देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी श्री. आर. आर. देशपांडे म्हणाले, 'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी काम करणे महत्त्वाचे आहे. त्यातूनच पुढील पिढ्यांसाठी पर्याय उपलब्ध होतील.'

'किर्लोस्कर'चे उपाध्यक्ष श्री. चंद्रहास रानडे यांनीही पर्यावरणाविषयक मुद्द्यांवर विचार मांडले. प्राचार्य डॉ. मनोज भालेराव यांनी पर्यावरण संवर्धनासाठी महाविद्यालयाकडून राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांवर प्रकाश टाकला. यावेळी 'किर्लोस्कर'चे नाशिक प्रकल्पप्रमुख रमेश चव्हाण, राहुल बोरसे, महोत्सव संचालक वीरेंद्र चित्राव, सुवर्णा भांभुरकर तसेच महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. अमोल रासने, प्रा. डॉ. शिवाजी गवळी, प्रा. डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया अॅकॅडमिक डीन प्रा. डॉ. योगिता अहिरे प्लेसमेंट अधिकारी प्रा. इंद्रजीत सोनवणे, विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा. सुहास धारणे, परीक्षा अधिकारी प्रा. डॉ. संदीप दिवे, ग्रंथपाल श्री. संदीप दराडे, प्राध्यापक वृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. दुपारच्या सत्रात वन्यजीव छायाचित्रे, बांबू पासून बनवलेल्या वस्तू व विविध तृणधान्यांचे स्टॉल्स मांडण्यात आले. शिवानी परदेशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण बोडके यांनी आभार मानले.

***

**✲ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ✲**




**दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करताना तिरंग्याच्या रंगांचा वेष परिधान केलेले पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थी, समवेत मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे आणि शिक्षिका**

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**
**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**
**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## इ अँड टी सी इंजिनिअरिंग विभाग

### फॅकल्टी आऊटरिच प्रोग्रॅम

दि. २५ व २६ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवसीय फॅकल्टी आऊटरिच प्रोग्रॅम अंतर्गत, नाशिक विभागास भेट देण्यात आली. पहिल्या दिवशी नाशिक म्हसरूळ, मेरी भागातील इंजिनिअरिंग कॅम्पस, शाळा, कनिष्ठ महालिद्यालय, इतर परिसर पाहण्यात आला. प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, डॉ. अमोल रासने यांच्या समवेत कॅम्पस मधील अनेक नाविन्यपूर्ण गोष्टींची माहिती, त्याचबरोबर वेगवेगळ्या स्तरावरील अनेक कला कौशल्यांना दिलेले प्राध्यान्य, डिजिटल क्लास रूम, वेगवेगळी ऑफिसेस अशा अनेक गोष्टी प्रत्यक्ष पाहत अनेक विषयांवर सवांद करण्यात आला. कॅम्पस मधील संपूर्ण प्रसन्न वातावरण अतिशय सुंदर आणि एकूणच आदर्श निर्माण करणारे आहे याचा प्रत्यक्षात अनुभव घेतला. तसेच, पुणे येथील इ अँड टी सी विभाग प्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी ICGEWE - २५ याबाबत सर्वांना माहिती NSS कॅम्प अंतर्गत संत सेवा सेना प्रविष्ट आदरणीय गुरूवर्य संजय गोडबोले यांच्या एका नावीन्यपूर्ण शिल्पकलाकृती प्रकल्प ''भागवत सृष्टी'' या स्थळाला भेट देण्यात आली. संध्याकाळी संस्थेच्या कै. मा. ब. उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालयातील रहिवासी मुलांसोबत हितगुज साधले. मुलांचे राहणीमान, त्यांची व्यवस्था, कामांचे नियोजन, मुलांचे स्वावलंबी जीवन अशा अनेक गोष्टी जवळून बघितल्या. सर्वांची निवासाची उत्तम सोय वसतिगृहात केलेली होती. दुसऱ्यादिवशी मुलांची सकाळी ठीक ५:०० वाजेपासूनची दिनचर्या ही खूप काही शिकवण देणारी होती. सकाळी थोडा वेळ समाधी मंदिरात मुलांकडून ध्यान आणि प्राणायाम घेण्यात आले. त्यानंतर शाळेतच झेंडा वंदनाचा कार्यक्रम झाला. सर्व गोष्टी जीवनाचे वेगळेच दर्शन घडवून देत होत्या. त्यानंतर विद्या प्रशाला तळेगाव अंजनेरी भागास भेट दिली. झेंडा वंदन, मुलांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रमानंतर शाळेतील संपूर्ण शिक्षकांशी ICGEWE-२५, NEP २०२०, (एज्युकेशन सेल), Autonomous (स्वायत्त) आणि Sustain Ability and Development (शाश्वतता विकास मूल्यवर्धित अभ्यासक्रम) या विषयावर सखोल सवांद झाला. यांमध्ये संचालक श्री. अमोल जोशी यांनी शाळेतील अनेक प्रकल्पाविषयी तसेच कौशल्य प्राप्त करण्यासाठीच्या अनेक अभ्यासक्रमाची रचना याबाबत माहिती दिली. ग्रंथालयातील एक आदर्श नमुना असलेल्या आगळ्यावेगळ्या प्रकल्पाविषयी माहिती, निसर्गरम्य वातावरणातील परिसर, रोटरी क्लब अंतर्गत उभारलेल्या प्रकल्पाची संपूर्ण माहिती संचालक श्री. अमोल जोशी यांनी दिली. अशा प्रकारचा उपक्रम एक नवीन दिशा देणारा ठरला. या भेटीसाठी संचालक श्री. सुनील रेडेकर आणि श्री. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी सहकार्य केले.

### रणसंग्राम द अल्टिमेट स्पोर्ट्स इव्हेंट

दि. ३० जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी २०२५ दरम्यान विद्यालयामध्ये आयोजित वार्षिक क्रीडास्पर्धा 'रणसंग्राम - द अल्टिमेट स्पोर्ट्स इव्हेंट' उत्तमरीत्या पूर्ण झाली. रणसंग्रामामध्ये विविध उपक्रमांमधून भाग घेतलेल्या मुलांमधून इ.अँड टी.सी विभागातील मुलांनी स्पोर्ट्स चॅम्पियनशिप ट्रॉफी मध्ये प्रथम क्रमांक पटकविला. विभागातील प्राध्यापकांनीसुद्धा सक्रिय सहभाग घेतला.

### अभिनंदनीय

दि. १७ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये, हाय एंड रडार सिस्टम्सवर

कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय वक्ते आणि विषय तज्ज्ञांना आमंत्रित केले होते. DIAT मधील मार्गदर्शकांनी दि. १६ आणि १८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रो. कोनराड जेड्झेजेव्स्की यांची संपर्क अधिकारी म्हणून निवड केली होती. प्रो. कोनराड हे पोलिश शास्त्रज्ञ आणि रडार तज्ज्ञ आहेत. त्यांच्यासोबत पुण्यातील अनेक वारसा स्थळांना भेट दिली आणि त्याचबरोबर भारतीय संस्कृती, इतिहास आणि औद्योगिक व्यवस्थेबद्दल विस्तृत वर्णन केले. या संपूर्ण उपक्रमामध्ये मिळालेला अनुभव अतिशय छान होता. अनेक नवीन विचारांना प्रेरणा मिळाली.

पेपर शीर्षक : सक्षम इंटरॲक्टिव्ह ट्रेनिंग मॉड्यूल

लेखक : सिमरन मुल्ला, प्रतीक्षा फाळके, अदिती मंथोले

मार्गदर्शक : डॉ. एस. आर. लिटके.

कॉन्फरन्स तपशील : AI (ICAISA २०२५) सह IoT आणि सुरक्षा मधील प्रगतीवरील आंतरराष्ट्रीय परिषद संशोधक, उद्योग व्यावसायिक आणि IoT शिक्षणतज्ज्ञांना त्यांच्या नवीनतम कल्पना, ट्रेंड आणि IoT, सुरक्षा प्रणाली आणि AI - चलित अनुप्रयोगांच्या क्षेत्रातील आव्हाने सादर करण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी जागतिक व्यासपीठ प्रदान करते. शैक्षणिक संशोधन आणि उद्योगाच्या गरजा यांच्यातील अंतर भरून काढणे हे उद्दिष्ट आहे.

तृतीय वर्षातील विद्यार्थिनी कु. अवनी ठाकूर हिचे स्कॉपस इंडेक्स्ड जर्नल JEEE मध्ये फेब्रुवारी महिन्यात पेपर प्रकाशन झाले. कु. अवनी ठाकूर हिचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

### अभिनंदनीय

